# ALL NATIONS GOSPEL PUBLISHERS



Copyright ANGP

www.angp-hb.co.za

info@angp.co.za

*Marathi Heart Book*

# मानवी हृदय

Copyright ANGP

**COPYRIGHT**
ISBN 0-908412-13-4

E-MAIL: info@angp.co.za
**ALL NATIONS GOSPEL PUBLISHERS**
P.O. Box 2191, PRETORIA, 0001, R.S.A.
(A Gospel Literature Mission financed by donations)
(Reg. No. 1961/001798/08)

# मानवी हृदय

किंवा

## आत्मिक हृदय दर्पण

(दहा चित्रांत सादर केलेलें रुपक)

हें पुस्तक व त्यांतील चित्रें फ्रान्स देशांत इ. स. १७३२ त प्रथम अस्तित्वांत आलें. ह्या पुस्तकाला "आत्मिक हृदय दर्पण" किंवा "हृदय पुस्तक" म्हणतात, आणि त्यांत नमूद केलेलें धर्मग्रंथीय खोल सत्य व मुल्य ह्यामुळें जवळ जवळ सर्व युरोपिय भाषांत हें पुस्तक लिहीलें आहे, आणि सर्व श्रेणींतील व संप्रदायांतील लोक हें वाचतात.

आफ्रिकी देशांतील लोकांची राहणी व विचारसरणी यांना अनुसरून हें पुस्तक लिहीलें असल्यामुळें आणि अनेक आफ्रिकी भाषेंत छापल्यामुळें, आफ्रिकी गृहांत व हृदयांत ह्या पुस्तकाचा प्रवेश झाला आहे. जुन्या करारांत दिलेलें देवाचें वचन व जें नव्या करारांत पूर्णतेस आलें, त्याच्या सत्याचा अनुभव पुष्कळ लोकांना आला. तें वचन असें "मी तुम्हांस नवें हृदय देईन. तुमच्या ठायीं नवा आत्मा घालीन." (यहेष्केल ३६–२६ इब्री ८–१०)

—जे. आर. स्वेन्ड

मराठी अनुवादक :
डॉ. वि. शि. [illegible]

ऑल नेशन गॉस्पेल पब्लीशर्स
२२४ क्रिस्टोफेल स्ट्रीट,
.टोरीया, साउथ आफ्रिका

Copyright ANGP

जो कोणी पाप करितो तो स्वैर वर्तन करितो; पाप हें स्वैर वर्तन आहे.

❖ ❖ ❖

तुम्हांला हें माहीत आहे कीं पापें हरण करावीं म्हणून तो प्रकट झाला; त्याच्या ठायीं पाप नाहीं.

❖ ❖ ❖

जो कोणी त्याच्या ठायीं राहतो तो पाप करीत नाहीं; जो कोणी पाप करितो त्याला त्यानें पाहिलें नाहीं व त्याला ओळखलेंहि नाहीं.

❖ ❖ ❖

मुलांनो, कोणी तुम्हांस बहकवूं नये; जसा तो नीतिमान आहे तसा नीतीनें वागणारा इसमहि नीतिमान आहे.

❖ ❖ ❖

जो पाप करितो तो सैतानापासून आहे; कारण सैतान प्रारंभापासून पाप करीत आहे. सैतानाचीं कृत्यें नष्ट करावीं यासाठींच देवाचा पुत्र प्रकट झाला.

❖ ❖ ❖

जो कोणी देवापासून जन्मला आहे, तो पाप करीत नाहीं. कारण त्याचें बीज त्याजमध्यें राहतें, त्याच्यानें पाप करवत नाहीं, कारण तो देवापासून जन्मला आहे.

❖ ❖ ❖

यावरून देवाचीं मुलें व सैतानाचीं मुलें उघड होतात, जो कोणी नीतीनें वागत नाहीं तो देवापासून नाहीं व जो आपल्या बंधूवर प्रीति करीत नाहीं तोही नाहीं.

१ योहान ३ : ४–१०

Copyright ANGP

# मानवी हृदय

## देवाचें मंदिर किंवा सैतानाचा कारखाना

( १ योहान ३ : ४–१० )

हें पुस्तक नवीन नाहीं. दोनशें वर्षांपूर्वी हें प्रथम फ्रान्स देशांत प्रसिद्ध झालें, आणि हजारो लोकांना त्याजपासून मोठा आशिर्वाद मिळाला. आत्मिक आरशासारखा ह्या पुस्तकाचा उपयोग झाला आहे. परमेश्वर पाहतो तसें मनुष्यांनी आपली आत्मिक दशा ह्या पुस्तकाद्वारें ओळखीली आहे. पुष्कळांनी आपल्या पापी अंत:करणाचें चित्र ह्या पुस्तकाच्या पानांत पाहिलें आहे, आणि पश्चात्ताप केला, आणि नवें अंत:करण व नवा आत्मा प्राप्त करून घेतला आहे.

हें पुस्तक वाचीत असतांना ही गोष्ट लक्षांत असूं द्या कीं हें एक आरसा आहे आणि त्यांत तुम्ही स्वत:स पाहूं शकतां. तुम्ही निधर्मी असा किंवा ख्रिस्ती असा विश्वास न ठेवणारे असा, किंवा धर्ममंद झालेले असा, परमेश्वर तुम्हास पाहतो तसें तुम्ही स्वत:स पाहाल. परमेश्वर व्यक्तीकडे नाहीं तो मनुष्याच्या अंत:करणाकडे पाहतो.

सैतान हा सर्व लबाडांचा बाप आहे, अंधाराचा राजकुमार ह्या जगाचा अधिपति, प्रकाशाच्या दूताचें रूप धारण करितो. पुष्कळ त्याला उजेडाचा दूत मानितात आणि जेव्हां त्याचें खरें रूप प्रगट होतें तेव्हां त्यांना तें रुचत नाहीं. जसें पूर्वीच्या काळीं तसें आजहि पुष्कळ खोटे प्रेषित व ठगबाजीनें भरलेलें कामकरी आहेत; तें ख्रिस्ताचें प्रेषित असल्याचा आव आणितात. ह्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं; सैतानहि स्वत: तेजोमय देवदूताचें रूप धरितो (२ करिंथ ११: १३–१४). सैतान ह्या जगाचा देव, मनुष्यांची मनें व डोळे आंधळी करितो व त्यामुळे ते देवाचें प्रेम, त्याचें गौरव व त्याचें राज्य पाहूं शकत नाहीं, तसेंच उद्धारकर्ता प्रभु येशू ख्रिस्त ह्यालाहि ते कधीं पाहणार नाहींत. सर्व पापी जन व विश्वास न ठेवणारे देवाच्या प्रति आंधळे व मृत झालेले असे आहेत. ह्या युगाच्या देवाचा आत्मा त्याजवर आधिपत्य करितो. होणाऱ्या नाशासंबंधी त्यांचे डोळे कोणत्याहि प्रकारें उघडले गेले नाहींत तर सर्वकाळाच्या

Copyright ANGP

नाशाकडे त्यांचे पाय त्यास नेतात. जो असें म्हणतो कीं "माझ्यांत पाप नाहीं" तो स्वत:स फसवितो.

हें पुस्तक वाचून त्यांतील चित्रांचा अभ्यास कराल तर तुमचें स्वत:चें अंत:करण कसें आहे हें तुम्हाला दिसेल. देवाच्या प्रकाशाला तुमच्या अंत:करणाची स्थिती कशी आहे हें दाखवूं द्या. आपल्या पापाचा अंगिकार करा, नाकार करूं नका, कारण देवाचें वचन आपल्यास हें सांगतें कीं "जर आपण म्हणतो कीं आपल्याला पाप नाहीं तर आपण स्वत:ची फसवणूक करितो आणि आपल्या ठायीं सत्य नाहीं. परंतु जर आपण स्वत:चीं पापें पदरीं घेतो तर तो विश्वासू व न्यायी आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील व आपल्याला सर्व अधर्मापासून शुद्ध करील" (१ योहान १:१–१०) "देवाचा पुत्र येशू ख्रिस्त याचें रक्त आम्हांस सर्व पापापासून शुद्ध करिते"

तुम्हावर सैतानाचें किंवा देवाचें राज्य चालते. तुम्ही पापाचें गुलाम किंवा देवाचे दास आहा. पाप जर तुम्हांवर राज्य चालविते तर त्याचा नाकार करूं नका. उलटपक्षीं देवाला हांक मारा, तो येशू ख्रिस्ताच्या द्वारें तुम्हास मुक्त करायास तयार आहे; तो पाप्यास तारायास या जगांत आला, पाप व सैतान यांचा तुम्हावरील पगडा मोडायास आला. तो आपलें तारण आहे पवित्र परमेश्वराच्या समक्षतेंत तुम्ही आहां; तो सर्व गुप्त गोष्टी पाहतो; तुमच्या जीवनांतील सर्व गुप्त विचार व कृति तो पाहतो. तुमचें कर्म किंवा तुम्ही स्वत: देवापासून लपून राहणें शक्य नाहीं कारण "ज्याने कान लाविला तो ऐकणार नाहीं काय ? ज्यानें डोळा घडिला तो पाहणार नाहीं काय ?"

"परमेश्वराचे नेत्र अखिल पृथ्वीचें निरीक्षण करीत असतात, जे कोणी सात्विक चित्तानें त्याच्याशीं वर्ततात त्यांचें सहाय्य करण्यांत तो आपलें सामर्थ्य प्रगट करितो" (२ इतिहास १६:९)

"कारण देवाची दृष्टि प्रत्येकाच्या आचरणावर असते; त्याचें प्रत्येक पाऊल तो पाहतो. अधर्मी ज्यांत लपून राहतील असा काळोख, असा घोर अंधकार नाहीं" (ईयोब ३४: २१–२२)

"येशूला तर सर्वांची ओळख असल्यामुळें त्याने स्वत:ला त्यांच्या हातीं सोपविले नाहीं." (योहान २:२४)

Copyright ANGP


"ज्याच्या अपराधाची क्षमा झाली आहे ज्याच्या पापावर पांघरुण घातलें आहे, तो धन्य! ज्याच्या हिशेबीं परमेश्वर अधर्माचा दोष लावीत नाहीं, व ज्याच्या मनांत कपट नाहीं, तो मनुष्य धन्य!" (स्तोत्र ३२:१—२)

आजहि येशू म्हणत आहे, "अहो कष्टी व भाराक्रांत जन हो, तुम्ही सर्व मजकडे या, म्हणजे मी तुम्हाला विश्रांति देईन" (मत्तय ११:२८)

## चित्रांचा अर्थ

हें चित्र एका सांसारिक पुनरुज्जीवन न झालेल्या पुरुष किंवा स्त्रीच्या हृदयाचें आहे; पवित्र शास्त्रांत ह्याला पापी असें म्हटलें आहे, म्हणजे सांसारिक भावना किंवा शरिराच्या इच्छा आणि लालसा यांनी चालविलेली व्यक्ति. परमेश्वर जसें हृदयाला पाहतो तसें हुबेहूब हें चित्र रेखाटलें आहे. नीतिसूत्रें २३; २९—३३ यांत वर्णन केल्याप्रमाणें लाल डोळे दारुडेपणाचें लक्षण आहे. हाय हाय कोण म्हणतो? अरे, अरे, कोण करितो? तंटाभांडणांत कोण पडतो? गाऱ्हाणीं कोण सांगतो? विनाकारण घाय कोणास होतात? धुंदी कोणाच्या डोळ्यांत असतें? जे फार वेळपर्यंत द्राक्षारस पीत राहतात, जे मिश्रमद्याचा पूर्ण आस्वाद घेण्यास जातात, त्यांचा द्राक्षारस कसा तांबडा दिसतो, प्याल्यांत कसा चालतो, घशांतून खाली कसा सहज उतरतो हें पाहत बसूं नको. शेवटीं तो सर्पासारखा दंश करितो, फुरशाप्रमाणें झोंबतो. तुझे डोळे विलक्षण प्रकार पाहतील, तुझ्या मनांतून विपरित गोष्टी बाहेर पडतील.

ह्या चित्रांत मस्तकाच्या खालीं मनुष्याचें हृदय दिसतें; त्यांत वेगवेगळे प्राणी दाखविले आहेत; हे प्राणी मानवी हृदयांतील निरनिराळ्या व पुष्कळ पापांचे दर्शक आहेत; हृदय हेंच पापासाठीं आसन व वसतिस्थान आहे. परमेश्वर आपला प्रवक्ता ईर्मया याचें तोंडून असें सांगतो कीं, "हृदय सर्वांत कपटी आहे, तें असाध्य रोगाने ग्रस्त आहे, त्याचा भेद कोणास समजतो?" (ईर्मया १७:९) येशू स्वत: या गोष्टीला पुष्टि देऊन म्हणतो, "कारण आंतून म्हणजे मनुष्याच्या अंत:करणांतून दुष्ट विचार निघतात; जारकर्में, चोऱ्या, खून, व्यभिचार, लोभ, दुष्टपणा, कपट, कामातुरपणा, दुष्टदृष्टि, शिव्यागाळी, गर्व, मूर्खपणा. या सर्व वाईट गोष्टी आंतून बाहेर निघतात व मनुष्याला अपवित्र करितात." (मार्क ७:२१-२३)



चित्र नं. १–पापी मनुष्याचें हृदय

**१. मोर**––मोराच्या सौंदर्याची सर्वच प्रशंसा करितात, परंतु येथें मनुष्याच्या हृदयांत तो गर्वाचें पाप दाखवितो. लूसीफर जो अभिषिक्त दूत होता, एके काळीं देवाच्या पुढें चालणारा, देवाचा सेवक, गर्वामुळें पडला आणि याप्रकारें देवाचा शत्रू सैतान झाला. गर्व हा नरकाच्या अगदीं खाडींतून येतो आणि निरनिराळ्या प्रकारांनीं प्रगट होतो. कांहीं लोक आपल्या श्रीमंतीचा गर्व बाळगतात, कांहीं आपल्या उच्च शिक्षणाचा,

कांही आपल्या ऐटबाज पोषाकाचा, जेणेंकरून आपल्या शरिराचा भाग बेशरमपणें उघडा राहील असा. कांही छनछन वाजणाऱ्या दागिन्याचा, कंठीचा आणि आंगठीचा; या सर्वांचें वर्णन यशया ३ : १७-२४ येथे व्यवस्थितपणें केलें आहे. कांहीं आपल्या वाडवडिलांचा, राष्ट्राचा, संस्कृतिचा, खेळाडूपणाचा अभिमान बाळगतात, आणि हें विसरतात कीं, "देव गर्विष्ठांचा विरोध करितो, आणि लिनांवर कृपा करितो" (१ पेत्रस ५·५) देव गर्व व उद्दामपणा यांचा द्वेष करितो (नीति ८.१३) "गर्व झाला कीं नाश ठेवलेला. मनाचा ताठा अधःपाताचें मूळ होय" (नीति १६:१८)

२. **बोकड**—दुर्गंधानें व लालसानें भरलेला प्राणी—पापवासना, अनीति, व्यभिचार, परस्त्रीगमन असे दुर्गुण दर्शवितो. वर उल्लेखलेली पापें या आधुनिक पण शेवटच्या काळांत इतकीं वाढलीं आहेत की येशूनें दोन हजार वर्षांपूर्वी कथन केलेल्या शब्दांचें सत्य मान्य करावे लागते, ते हें कीं शेवटले दिवस सदोम व गमोरा यांच्या दिवसासारखे होतील. ह्या आधुनिक वाऱ्यानें स्त्री-पुरुषांच्या मनाची पकड घेतली, धार्मिक लोकांच्या गृहांत, संस्थांत, शाळांत व वसतिगृहांत प्रवेश केला, इतकेच नव्हे, तर हें भ्रष्टतेचें, बीज, सीनेमा, नाटकगृह, सडके वाङ्मय आणि इतर नानाप्रकारें बिनदिक्कपणें आणि पैशाचिक सूक्ष्मतेनें मनुष्यांच्या मनांत पेरलें जाते; ज्याला देव पाप म्हणतो त्याला आधुनिक नीति समजली जाते. हजारो तरुण लोक उत्तम जीवनाच्या कल्पना, चलचित्रपट आणि कादंबऱ्या वाचून बनवितात. आणि शेवटीं दुःख, लज्जा, खेद यांत आपले दिवस काढतात. असात्त्विक आणि बेताल नट व नटी तरुण पिढीकरिता नायक व नायिका होऊन बसतात. नाचगृह अनेकदां भ्रष्टाचाराचें माहेरघर बनलेले असतात. देवाचे शुद्ध विभूती, जसे यौसेफ आणि इतर जन नमुन्यादाखल मानिले जात नाहीत. अशिक्षित आणि धर्महीन झुलू लोक जे आपल्यामधील व्यभिचारी व व्यभिचारिणींना जीवें मारतात ते आपल्यासारख्या सुसंस्कृत पिढीला सदाचाराचें शिक्षण देऊं शकतात, आणि न्यायाच्या दिवशीं आपल्याविरुद्ध उभें राहून आपल्याला दोषी ठरवितील. व्यभिचाराशीं खेळूं नका, पण त्यापासून दूर पळा असें परमेश्वर आपणांस सांगतो. "जे कांही दुसरें पापकर्म मनुष्य करितो तें शरिराबाहेरून होते;

परंतु जो जारकर्म करितो तो आपल्या शरिरासंबंधानें पाप करितो. तुमचें शरीर तुम्हामध्यें वसणारा जो पवित्र आत्मा देवापासून तुम्हांस मिळाला आहे त्याचें मंदिर आहे हें तुम्हास ठाऊक नाहीं काय ? आणि तुम्ही आपले नव्हां" (१ करिंथ ६; १८-१९) "जर कोणी देवाच्या मंदिराचा नाश करितो तर देव त्याचा नाश करील; कारण देवाचें मंदिर पवित्र असतें, तसेंच तुम्ही आहां" (१ करिंथ ३; १७)

३. **डुक्कर**—हा प्राणी खादाडपणा व पियक्कडपणाच्या पापास दर्शवितो. हे जनावर घाणेरडे असते, आणि त्याच्यापुढें आलेलें चांगलें वाईट सर्वच खाऊन टाकितो; तद्वत पापी हृदय सर्व वाईट विचार, वाईट भाषा, वाईट चित्र, वाईट वाङ्मय आत्मसात करिते. मनुष्याचें शरीर जिवंत देवासाठीं मंदिर असें सिद्ध केलें आहे, परंतु तें अशुद्ध अन्न, घाणेरड्या संवयी, जसे तंबाकू ओढणें किंवा खाणें, अफू आणि इतर अपायकारक पदार्थांचें सेवन करणें, यामुळें विटाळलें जातें, स्त्रीपुरुषांना तंबाकू ओढणें आणि अफू खाणें ह्या संवयी पूर्वीं कधीं नव्हत्या इतक्या प्रमाणांत बळावल्या आहेत. आतां देवाची शक्तिच अशा तंबाकूच्या बळींना व राक्षसाच्या गुलामांना सोडवूं शकेल. धार्मिक वृत्तिचें बहुतेक लोक उपासनालयांत बसून बिडी ओढणें त्या पवित्र घराला दूषित करणें आहे, असें समजून तेथें बसून बिडी ओढित नाहींत, तरी त्यांचे शरीर जें खरोखरी देवाचें मंदिर आहे त्याला ह्या दुर्गंध वनस्पतीनें दूषित करण्यास भीत नाहीत.

"तुमचें शरीर तुम्हामध्यें वास करणारा जो पवित्र आत्मा देवापासून तुम्हास मिळाला आहे त्याचें मंदिर आहे हें तुम्हास ठाऊक नाहीं काय ? जर कोणी देवाच्या मंदिराचा नाश करितो, तर देव त्याचा नाश करील" (१ करिंथ ६; १९; ३; १६-१७)

देवाच्या दृष्टींत खादाड मनुष्य तिरस्करणीय आहे. आपण जिवंत राहण्याकरितां खातों, खाण्याकरितां जिवंत राहत नाहीं. चांगलें अन्न खाल्ल्यानें भूक शमते, परंतु लालसा सारखी म्हणते "द्या, द्या!" लालसा कधीही शमविली जात नाही, कधींहि तृप्त होत नाहीं. जुन्या कराराच्या नियमाप्रमाणे खादाड व पिणारे हे दगडमारास पात्र होते (अनुवाद २१. १८-२१) "कारण मद्यपि व खादाड दरिद्री होतात, कैफ मनुष्याला

Copyright AIIGC

चिध्या नेसवितो. खादाडांचा सोबती आपल्या बापास लाज आणितो") (नीति २३;२१;२८;७) एकदां एक श्रीमंत, खादाड व वासनांचा गुलाम असा मनुष्य मरण पावला, नरकांत जाऊन पडला, आणि अवर्ण-नीय यातना भोगीत पडला, त्याची गोष्ट आठवा. पिण्याची दुष्ट कथा काय सांगावी ! ती सर्वश्रुतच आहे. देव आपल्या वचनांत स्पष्टच सांगतो कीं मद्यपी देवाच्या राज्याचा कधींही वारिस होणार नाहीं. जे मद्य तयार करितात व विकतात तेहि देवाच्या दृष्टीनें सारखेच दोषी आहेत, कारण परमेश्वर म्हणतो "ज्यांचें शौर्य द्राक्षारस पिण्यांत आणि ज्यांची बहादुरी मद्य मिसळण्यांत आहे ते हायहाय करणार" (यशया५;२२) "जो आपल्या शेजाऱ्यास मद्य पाजितो त्याला धिक्कार असो ! तूं त्यांची नग्नता पाहावी म्हणूनं आपला संतप्त क्रोध त्यांत मिसळून त्याला मस्त करितोस" (हबक्कूक २.१५) "विणा, सारंगी, डफ, बांसरी व द्राक्षारस हीच त्यांची मेजवानी, पण ते परमेश्वराच्या कृतीकडे लक्ष देत नाहींत" (यशया ५;१२) "फसूं नका. जारकर्मी, मूर्तिपूजक, व्यभिचारी, चैनबाजा पुंमैथुनकारी, चोर, लोभी, मद्यपी, चहाड, व वित्त हरण करणारे यांस देवाच्या राज्याचें वतन मिळणार नाहीं" (१ करिंथ ६;९-१०) "देहाची कर्में तर उघड आहेत. तीं अशीं आहेत, जारकर्म, अशुद्धपणा, कामातूरपणा मूर्तिपूजा, चेटकें, वैर, कलह, मत्सर, राग, तट, फुटी, पक्षभेद, हेवा, दारुबाजी, रंगेलपणा, आणि अशा इतर गोष्टी. अशीं कर्में करणाऱ्यांना देवाच्या राज्याचें वतन मिळणार नाहीं" (गलती ५; १९-२१) "द्राक्षारसानें मस्त होऊं नका. त्यांत बेतालपणा आहे; तर आत्म्यानें व्हा" (इफिस ५;१८)

तान्हेल्यास येशू आमंत्रण देतो, "जर कोणी तान्हेला आहे, तर त्यानें मजकडे येऊन जीवनाचें पाणी मुबलक प्यावें" (योहान ७;३७) 'अहो तान्हेल्यांनो, तुम्ही सर्व जलाशयाकडे या, जवळ पैका नसलेले तुम्ही या, सौदा करा, खा, या, पैक्यावांचून व मोलावांचून द्राक्षारसाचा व दुधाचा सौदा करा" (यशया ५५;१) "मी देईन तें पाणी जो कोणी पिईल त्याला कधीं तहान लागणार नाही; जें पाणी मी त्याला देईन तें त्याज-मध्ये' सार्वकालिक जीवनासाठीं उफळत्या पाण्याचा झरा असें होईल" (योहान ४;१४)

Copyright AMGP

**४. कांसव**—हा प्राणी आलस्य, दिरंगाई व जादूटोणा दर्शवितो. अविश्वास हा चेटकीच्या पापासारखा आहे. "आळशाची वासना त्याला मारून टाकिते, कारण त्याचे हात श्रम करण्यास कबूल नसतात. तो दिवसभर लाभाची हांव धरितो" (नीति २१;२५-२६), यहोशवा ईस्रायल लोकांस म्हणत असे, "देश हस्तगत करण्यास आळस करूं नका" मनुष्यस्वभाव देवाच्या गोष्टी मिळवून घेण्यास सुस्त व आळशी आहे. येशू म्हणाला. "अरुंद दरवाजाने आंत जाण्याचा जोरानें यत्न करा" (लूक१३;२४) "जो शोधतो त्याला सांपडते" "स्वर्गाच्या राज्यावर हल्ला चालला आहे, आणि जबरदस्त लोक तें नेटानें घेतात" (मत्तय ११:१२)

आपल्या आत्म्याचें तारण व सुस्थिती यासंबंधी आळस केल्यास त्याचा परिणाम नाश हा होतो. आळस आपल्याला प्रार्थनेपासून देवाच्या गूढ गोष्टींचा शोध करण्यापासून व देवाची उत्कृष्ट वचनें आपलीं करून घेण्यापासून दूर ठेवितो, नाशाप्रत नेतो. देव जर तुमच्याशीं बोलला आणि तुमचें हृदय आजच त्याला द्या असें आग्रहानें सांगितलें तर सैतान म्हणतो, आज नाहीं, उद्यां किंवा पुढें कधी' सोईच्या दिवशीं द्या. तो दिवस कदाचित कधीं येणार नाहीं, व तुम्ही तुमचें तारण झाल्याशिवाय व ख्रिस्ताशिवाय मृत्युमुखीं पडाल. परमेश्वर म्हणतो, "आज जर तुम्ही त्याची वाणी ऐकाल, तर आपलें हृदय कठीण करूं नका" (इब्री ३;७-८) किती लोकांनीं तारणाचा दिवस लांबणीवर टाकिला, आणि तो दिवस येण्यापूर्वीच मरण पावले. उद्यांचा दिवस तुमच्या हातचा नाहीं.

कांसवाचें कवच जादुगीर लोक जादू करण्यासाठी उपयोगांत आणितात. आणि जिवंत देवावर विश्वास ठेवण्यापेक्षां जादूटोणा, भविष्य-कथन, चेटकें अशा गोष्टींवर विश्वास ठेवण्याच्या पातकांचे दर्शक आहे. परिक्षाकाल, आजारकाल, विपत्काल, व शोककालीं सुदैव अगर दुर्दैवावर भंरवसा ठेवण्यापेक्षा जिवंत देवाला हांक मारावी असें आपल्यास सांगितलें आहे; तो सहाय्य करण्यास तयार आहे, कारण "परमेश्वर मनुष्याची गती स्थिर करितो" (स्तोत्र ३७;२३) "कारण उन्नति ही पुर्वेकडून नव्हे, पश्चिमेकडून नव्हे, व अरण्याकडूनहि नव्हे तर न्याय करणारा देव आहे" (स्तोत्र ७५;६-७) देवानें इस्त्रायल लोकांस आज्ञा देऊन सांगितलें

Copyright ANCP

कीं "आपल्या पुत्रांचा व कन्यांचा अग्नींत होम करणारा दैवज्ञ, शकुन सांगणारा, जादुगार, चेटकी, मांत्रिक देवऋषि, पंचाक्षरी, अथवा इलमी असा तुमच्यापैकीं कोणी नसावा. जो कोणी असलीं कृत्यें करितो त्याचा परमेश्वराला वीट आहे" (अनुवाद १८:१०.१२) "कुत्रे, चेटकी, जार-कर्मी, खून करणारे, मूर्तिपूजक, लबाडीची आवड धरणारे व लबाडी बोलणारे लोक सर्व बाहेर राहतील (प्रगट २२;१५) तुम्ही भुतांकडे वळूं नका. शकुन सांगणाऱ्याकडे जाऊं नका किंवा त्यांना विचारपूस करूं नका. अशा रीतीनें त्यांच्याशीं पाप करून स्वतःस विटाळूं नका. "मी प्रभु तुमचा देव आहे" (लेवी १९;३१) "ते तुम्हास म्हणतील, भूतवैद्यांस व छांछूं करणाऱ्या मांत्रिकास विचारावयास जा; तेव्हां म्हणा लोकांनी आपल्या देवाला विचारूं नये काय ? जीवनाकरितां मेलेल्यास विचारावें काय ? धर्मशास्त्र व विधि यांकडे पहा, याप्रमाणें ते न बोलल्यास त्या-करितां निश्चयें प्रभातमय नाहीं" (यशया ८;१९-२०)

तुम्ही हें लहान पुस्तक वाचीत असतांना देव तुमच्याशीं बोलत आहे आणि तुम्ही आपल्या पापासाठीं पश्चात्ताप करावा आणि आपलें जीवन त्याच्या स्वाधीन करावें असें तुम्हास सांगत आहे; परंतु कासवाचा आत्मा जो तुमच्या हृदयांत आहे तुम्हास सर्व प्रकारच्या सूचना करून देवासंबंधी तुमचे ठराव पुढे ढकलण्यास लावितो, आणि तुमचें हृदय भीतिने भरितो. "मी खरोखरच ख्रिस्ती झालों तर माझें लोक, माझें मित्र, माझ्या सभोवतालचें जग मला काय म्हणेल ? नर्तन-कार्यक्रम, अल्पोपहार-कार्यक्रम, मौजेचे कार्यक्रम यांत यापुढे मी हजर राहिलों नाहीं तर काय परिणाम होईल ? ख्रिस्त येशूंत जी अगाध संपन्नता आहे, त्याची आश्चर्य-कारक शांती, अवर्णनीय आनंद, त्याचें वैभव, सुखानें भरलेलें आमरण जीवन ह्या गोष्टीकडे पाहण्याच्या ऐवजीं, ख्रिस्ताला आपल्या हृदयांत स्थान दिल्यानें कोणत्या गोष्टी सोडाव्या लागतील ह्याकडे तुम्ही पाहतां, आणि अशा रितीने मनुष्याचें भय व मरणाचें भय ह्यामुळें सैतानाच्या गुलामगिरींत कायमचें पडतां मरणाच्या भितीनें आयुष्यभर जे गुलाम राहिले त्यांना सोडविण्यास ख्रिस्त आला (इब्री ९;१४-१५) दिरंगाईमुळें तुमचें हृदय कठीण होत चाललें आहे व शेवटीं तें कासवाच्या कवचाप्रमाणें कठीण होईल.

Copyright AIIGR

५. **चित्ता**–हा फार भयानक व क्रूर प्राणी आहे. द्वेष, क्रोध, आणि असमतोलपणा मनुष्याच्या हृदयाचा कबजा घेतात आणि त्यामुळें पुष्कळदा खून होतात. असमतोलपणा काबूंत ठेवण्याचा प्रयत्न केला तरी एखादे काळीं त्याचे भयंकर परिणाम उघड होतात. तो तुमच्या हृदयांत आहे हें मान्य करून त्यापासून मुक्त करण्यास येशूला सांगणें हें बरें.

"संताप करून घेऊं नका" (उत्पत्ती ४५:५) "राग सोडून दे, क्रोधाविष्टपणाचा त्याग कर, जळफळूं नको, अशानें दुष्कर्माकडे प्रवृत्ति होते" (स्तोत्र ३७;८) "क्रोधाची निष्ठुरता व कोपाचा तडाखा हीं पुरवलीं पण प्रेमसंशयांपुढें कोण टिकेल ?" (नीति२७;४)"राग मूर्खांच्या हृदयांत वसतो, यास्तव आपल्या मनांतून राग दूर कर" (उपदेशक७; ९;११;३०) "सर्व क्रोध आपणापासून दूर कर." (कलसै३;८), पुष्कळजण आपला क्रोध मद्याने किंवा सूड घेण्याने शमविण्याचा प्रयत्न करितात, परंतु "त्यांचा द्राक्षारस सर्पाचें विष, भुजंगाचें जालीम गरळ आहे" (अनुवाद ३२;३३) पापी हृदयाला सूड घेणें बरें वाटतें, पण आपला सूड घेणारा देव आहे. येशू म्हणाला, "आपल्यासारखी आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर" आणि "आपल्या शत्रूवर प्रीति कर." जर आपल्या अपराध्यांची आपण क्षमा केली तर आपल्या अपराधांची क्षमा करण्याचें वचन देवानें दिलें आहे. दुर्मुखलेला व कुरकुऱ्या आत्मा देवाला त्याज्य आहे. रक्तपात व लढाई करण्याची दुष्ट वासना मनुष्याच्या हृदयांत आहे आणि कायमची शांति प्रस्थापित व्हावयासाठीं मनुष्याच्या हृदयांतच शांति असली पाहिजे.

६. **सर्प**–ह्यानें एदेन बगिच्यांत हवेस ठकविले. आणि देवाशीं जी गोड संगति व एकवाक्यता होती त्यांत बिघाड आणला, आदाम व हवा जगाचे अधिपति झालेले, देवाशीं पूर्ण सलोख्यानें राहत असलेले, लूसिफरची जागा घेतलेले असे जेव्हा सैतान, जो पडलेला दूत ह्यानें पाहिलें तेव्हां त्याच्या मनांत हेवा आला. हेव्यामुळें सैतानानें त्यांच्या नाशाचा व्यूह रचिला आणि देवाबरोबर त्यांचे जीवन व जी सुंदर एकवाक्यता होती त्यांमध्यें विसंगति निर्माण केली. इतर लोक आनंदित व सुखी आहेत हें पाहून पुष्कळांच्या मनांत असाच हेवा व मत्सर उभा राहतो आणि त्याचा परिणाम शेवटीं वाईट होतो. "प्रेमसंशय अधोलोकासारखा निष्ठूर आहे"

Copyright AHGP

(गीतरत्न ८:६) त्यामुळें मनांत वाईट विचार येतात. पुष्कळांच्या आनंदाचा भंग होतो, व खूनदेखील होतात. विवाहित लोकांत असें विषेशेंकरुन घडतें. व्यापारांत व वेगवेगळ्या कलांत सांगतां येत नाहीं इतके क्लेश व द्वेष निर्माण होतात. ह्याच्या हल्ल्यापासून ख्रिस्ती कामकरी, उपदेशक व पालक हेहि सुटलेले नाहींत. देवानें ह्याच्यापेक्षां आपल्या दुसऱ्या एखाद्या दासाचा अधिक उपयोग करून घेतला तर ही गोष्ट स्पष्ट होते. त्यांनीं सतत जागृत राहून "जें देवाचें प्रेम पवित्र आत्म्यानें तुमच्या अंत:करणांत ओतिले" त्या प्रेमानें भरलेले असावे हें बरें, नाहींतर हेव्या-मुळें त्यांची उपयुक्तता व सेवा ह्यावर काळे डाग येतात.

७. **बेडूक** — हा माती खातो; अधाशीपण व पैशाचें प्रेम, जें सर्व वाईटाचें मूळ आहे (१ तिमोथी ७:१०) अशा पापांना उल्लेखितो. कांगो-मधील कांहीं बेडूक शेकडों मुंग्या खातात, त्यांचीं पोटें फुगतात, व शेवटीं मरतात. दरिद्री व गरजू लोकांना मदत करण्यास अधाशी मनुष्य आपली मूठ उघडीत नाहीं, तर प्रामाणिक अप्रामाणिक सर्व उपायांनीं या जगाचें धन मिळवितो व सांठवून ठेवितो, त्याला तर जंग व कसर लागते. येशू स्वत: म्हणाला, "पृथ्वीवर आपणाकरितां संपत्ति साठवूं नका; तेथें कसर व जंग खाऊन नाश करितात, आणि चोर घर फोडून चोरी करितात; तर स्वर्गांत आपणाकरितां संपत्ति सांठवा; तेथें कसर व जंग खाऊन नाश करीत नाहींत, व चोर घर फोडून चोरी करीत नाहींत, कारण जेथें तुमची संपत्ति आहे तेथें तुमचें चित्तहि असणार" (मत्तय ६: १९–२२) आखान व त्याचें घराणे ह्यांनी सोनें, रुपें, जडजवाहीर, आणि पोषाकावर आपलें चित्त ठेवलें म्हणून त्याचा नाश झाला (यहोशवा ७). यहुदा इस्कार्योत ह्यानें पैशाच्या प्रेमामुळें आपला प्रभु व धनी ह्याचा विश्वासघात केला आणि शेवटीं गळफांस घेतला. पैसा वाईट आहे असें नाहीं, तसेंच सोनें, परंतु मनुष्याच्या मनांत दडून बसणारे पैशाचें प्रेम वाईट आहे. सर्व थरां-तील आणि वंशांतील हजारो स्त्री–पुरुष आपले व आपल्या कुटुंबियांचे जीव एकदम मोठें धन मिळण्याच्या दुर–इच्छेनें धोक्यांत घालीत आहेत; हें साधण्यासाठीं कुत्र्यांच्या व घोडयांच्या शर्यतींत मोठ्या रकमा मांडून जुगार व सट्टा खेळतात. अधिक तसदी न घेतां श्रीमंत होण्याच्या हौशी-मुळें चोऱ्या, खून, आत्महत्या असे प्रकार घडतात. पैशाचें प्रेम आणि

Copyright ANCP

अघाशीपण ह्यांना आणखी सोबती असतात, जसें नांवलौकिक व अधिकार इतरांवर अधिकार चालविण्यास राजकीय स्वरूपाचा हा अधिकार असो, गरिबांवर जुलूम करणारा संपत्तिक अधिकार असो, किंवा धार्मिक स्वरूपाचा असो, देवापेक्षां आपल्या सांप्रदायाची अधिक आस्था बाळगतात आणि एखादा संत त्यांच्या मंडळीच्या विरहित राहून ख्रिस्ताशीं निष्ठ राहिला तर त्याला मंडळी बाहेर काढतात. (मार्क ९: ३८). येशू म्हणाला, "सांभाळा, सव प्रकारच्या लोभापासून दूर राहा; कोणाला पुष्कळ संपत्ति असली तर ती त्याचें जीवन होतें असें नाहीं" (लूक १२ :- १५). श्रीमंत पण एका मूर्ख मनुष्याची कथा येणेंप्रमाणें आहे: "कोणा एका धनवान मनुष्याच्या जमिनीला फार पीक आलें. तेव्हां त्यानें आपल्या मनांत असा विचार केला कीं मी काय करूं ? कारण माझें उत्पन्न सांठवावयास मला जागा नाहीं. मग त्यानें म्हटलें, मी असें करीन, आपली कोठार मोडून मोठीं बांधीन, आणि तेथें मी आपलें सर्व धान्य व माल सांठवीन, मग मी आपल्या जिवाला म्हणेन, हे जिवा, तुला पुष्कळ वर्षें पुरेल इतका पुष्कळ माल ठेविलेला आहे; विसांवा घे, खा, पी, आनंद कर; परंतु देवानें त्याला म्हटलें, अरे मूर्खा, आज रात्रीं तुला देवाज्ञा होईल; तेव्हां जें कांहीं तूं सिद्ध केलें आहे तें कोणाचें होईल ? जो कोणी आपणासाठीं द्रव्यसंचय करितो व देव—विषयक बाबतींत धनवान नाहीं, तो तसाच आहे" (लूक १२:१६—२१) "मनुष्यानें सर्व जग मिळविलें, आणि आपल्या जीवाचा नाश करून घेतला तर त्याला काय लाभ ?" (मार्क ८:३६) "आपण काय खावें, अशी जीवाविषयीं अथवा आपण काय पांघरावें अशी आपल्या शरिराविषयीं काळजी करूं नका.. तर तुम्ही त्याच्या राज्याच्या मागें लागा, म्हणजे त्याबरोबर हींहि तुम्हास मिळतील....जेथें तुमचें धन आहे तेथें तुमचें मनहि लागेल" (लूक १२.२२—३४)

८. सैतान — सर्व लबाडी बोलणाऱ्यांचा व लबाडी घडवून आणणाऱ्यांचा बाप नानाप्रकारच्या पापास प्रोत्साहन देतो, आणि अंत:करणावर अंमल चालवितो. येशू म्हणाला, "तुम्ही आपला बाप सैतान यापासून झालां आहां, आणि आपल्या बापाच्या वासनांप्रमाणें करावयास पाहतां. तो प्रारंभापासून मनुष्यघातक आहे, आणि तो सत्यांत टिकला नाहीं, कारण त्याजमध्ये सत्य नाहीं. तो खोटे बोलतो तें स्वत: होऊनच बोलतो, कारण

तो लबाड व लबाडाचा बाप आहे" (योहान ८:४४) श्वेत लबाडी, कृष्ण लबाडीइतकीच वाईट असते. लबाडी बोलली जाते, लिहीली जाते व कृतींत आणिली जाते. ढोंगी हाहि एक लबाडच आहे, कारण तो जसा नाहीं तसा असल्याचा आव आणून दाखवितों. देव खोटें बोलत नाहीं, तसेंच ख्रिस्ती मनुष्यहि खोटे बोलूं शकत नाहीं. "त्याच्याबरोबर आपली भागी आहे असें जर आपण म्हणतो आणि अंधारांत चालतो तर आपण खोटे बोलतो, सत्यानें वागत नाहीं" (१ योहान १:६) "कुत्रे, चेटकी, जारकर्मी, खून करणारे, मूर्तिपूजक, लबाडीची आवड धरणारे, व लबाडी करणारे लोक सर्व बाहेर राहतील" (प्रगट १:१५). देव "लबाड बोलणारा खोटा साक्षी" याचा द्वेष करितो (नीति ६:१९)

९. **तारा** — प्रत्येक मनुष्याच्या हृदयांतील सत्‌सत् विवेकबुद्धी दर्शवितो. येथें तो काळा, बिघडलेला, आणि दुष्ट असा आहे. सतत आणि जाणूनबुजून पाप करीत राहिल्यामुळें मृत्यु पावलेला असा आहे; अंध व विकृत झालेला व त्यामुळें स्वतःची कृति कशी आहे हें पडताळून पाहतां येत नाहीं. दुष्ट विवेक कधीं शांत तर कधीं त्रासलेला असतो. जेव्हां दोष देऊं नये तेव्हां दोष देतो व जेव्हां दोष द्यावा तेव्हां दोष देत नाहीं. तापलेल्या लोखंडानें होरपळल्यासारखा झाला असेल व विश्वासापासून दुरावल्यानें सर्व जाणीव व भावना नष्ट झाल्या असतील. भुतांचें शिक्षण, ठकविणाऱ्या आत्म्याचें शिक्षण, ढोंगीपणानें खोटे बोलणें ह्या गोष्टीकडे लक्ष देत असेल (१ तिमोथी ४: १–२) इब्री १० : २२)

१० **डोळा**—परमेश्वराचा डोळा हृदयांत काय चालतें तें सर्व पाहतो त्याच्या ज्योतिर्मय दृष्टीपासून कांहीं लपवितां येत नाहीं, म्हणून हृदयांतील सर्व गुप्त विचार व बेत तो पाहतो व जाणतो. (ह्या चित्रांतील डोळा मनुष्याच्या चेहऱ्यावरील भावनाहि दाखवितो.)

११. **अग्नीच्या लहान जीभा**—हृदयाच्या भोंवती असलेल्या जीभा, पापी मनाच्या आसपास असलेलें देवाचें प्रेम दाखवितात. देव पापाचा द्वेष करितो, तरी मानवावर प्रेम करितो. पापी मनुष्याचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही, तर त्यानें पश्चात्ताप करावा व जगावें अशी त्याची इच्छा आहे. पाप्यास तारायास येशू आला. एक पापी मनूष्य पश्चात्ताप करितो तेव्हां स्वर्गांत मोठा आनंद होतो. ह्या लहान जीभा

Copyright AMGP

येशू ख्रिस्ताचें रक्तहि दाखवितात "जगाचें पाप हरण करणारा देवाचा कोंकरा"

१२. **देवदूत**–देवाचें वचन दर्शवितो. देवाची ही इच्छा आहे कीं त्याने भ्रमांत पडलेले व पापानें भारावलेले स्त्री-पुरुषांशीं बोलावे व त्यांनीं पश्चात्ताप करावा आणि देवाचा प्रकाश व प्रेम आपल्या अंतःकरणांत येऊं द्यावे.

१३. **कबुत्तर**–पवित्र आत्म्याचें द्योतक आहे. सत्याचा आत्मा जो पापाविषयीं, धार्मिकतेविषयीं व न्यायनिवाडयाविषयीं खात्री करितो. येथें पवित्र आत्मा मनुष्याच्या हृदयाच्या बाहेर आहे. जेथें पापाचा अंमल चालतो तेथें तो राहूं शकत नाहीं.

ह्या चित्रांतील हृदय तुमच्या हृदयाशीं मिळते घेणारे असेल तर प्रभूला हांक मारा, त्याजवळ तुमचें हृदय उघडा, आणि त्याच्या वचनाचा प्रकाश आंत येऊं द्या. "प्रभु येशू ख्रिस्तावर विश्वास ठेव म्हणजे तुझें तारण होईल." तुमचें हृदय बदलून टाकण्यास नवीन हृदय व नवीन आत्मा देण्यास देव तयार आहे, असें करण्याचें त्यानें वचन दिलें आहे. दुसऱ्या चित्रांत हें चित्रित केलें आहे.

## चित्र २ रा

हें चित्र पश्चात्तापी मन दाखविते, असें कीं ते देवाचा शोध करूं लागते. देवाचें वचन जी तरवार आहे ती देवदूत धरून आहे, "देवाचें वचन सजीव, सतेज, कोणत्याहि दुधारी तरवारीपेक्षां तीक्ष्ण, जीव व आत्मा, सांधे व मज्जा यांस भेदून आरपार जाणारे, आणि मनाच्या भावना कल्पना यांचें परिक्षक असें आहे" (इब्री ४; १२) देवाचें वचन त्याला आठवण करून देतें की "पापाचें वेतन मरण आहे" आणि "मनुष्यांस एकदांच मरणें व त्यानंतर न्याय होणें नेमून ठेवले आहे" (इब्री ९; २७) पापी आणि विश्वास न ठेवणारे यांचा वाटा अग्नीच्या सरोवरांत होईल; तेथे गंधकाचा जाळ होतो.

देवदुताच्या दुसऱ्या हातांत एक कवटी आहे. पाप्याच्या स्मरणांत ही गोष्ट यावी कीं आपणा सर्वांस मरायाचे आहे, यासाठी ही कवटी आहे. आपलें शरीर, ज्यावर आपण येवढें प्रेम करितो, पोषाक चढवितो, अन्न देतो, सुंदरता आणितो, त्याची तलफ व लालसा तृप्त करण्यासाठीं त्याची




चित्र नं. २–दोषी ठरलेलें आणि शरण आलेलें हृदय


निगा राखून काळजी वाहतो तें शरीर मरणार व सडणार आहे, आणि किडे त्याला खाऊन टाकतील, परंतु आपला जीव व आत्मा निरंतर जिवंत राहणार आहेत आणि एक दिवस देवाच्या न्यायासनासमोर उभे राहणार आहेत.

येथें आपण हें पाहतों कीं पापी मनुष्य देवाच्या संदेशाकडे लक्ष देऊं लागतो आणि देवाच्या प्रेमाप्रत आपलें मन उघडें करितो. पवित्र आत्मा अशा अंधारानें व्यापलेल्या व पापी हृदयांत प्रकाशूं लागतो. देवाचा

प्रकाश आपल्या मंदिरांत प्रवेश करितो व सर्व अंधाराला बाहेर काढितो. जेव्हां देवाचा प्रकाश आंत येतो तेव्हां अंधाराला बाहेर जावे लागते. पाप जें निरनिराळ्या प्राण्यांच्या द्वारा दाखविले आहे त्याला पळून जावे लागते. म्हणून प्रिय वाचक, येशू जो जगाचा प्रकाश आहे, त्याला आपल्या अंत:करणांत प्रवेश करूं द्या आणि ह्या चित्रांत दाखविल्याप्रमाणें अंधकार व अंधाराची कामें तुमच्या हृदयाला सोडून जातील. येशू म्हणाला, "मी जगाचा प्रकाश आहे, जो मला अनुसरतो तो अंधारांत चालणार नाहीं" (योहान ८:१२) स्व-प्रयत्नांनी, आपल्या अगर इतरांच्या शहाणपणानें तुमच्या हृदयांतील अंध:कार तुम्ही बाहेर काढूं शकणार नाहीं. सर्वांत साधा, खात्रीचा, परिणामकारक, जलद आणि एकच मार्ग हा आहे कीं येशू जो प्रकाश आहे त्याला आंत येऊं द्या, आणि अंध:कार जो पाप आहे तो आपोआप बाहेर पडेल. काळोख्या रात्रीं चंद्र आणि तारे यांपासून कांहीं मदत होते, पण जेव्हां सूर्य उगवतो तेव्हां अंध:कार व गौण दिवे नाहींसे होतात. येशू धार्मिकतेचा सूर्य आहे. यरुशलेम येथील मंदिरांत जेव्हां त्यानें प्रवेश केला तेव्हां तेथें जे लोक, बैल, मेंढरे, कबुतरें विकीत होते त्यांना त्यानें बाहेर काढिले, आणि सराफांचे चबुतरें उलटे केले आणि म्हणाला, "असें लिहिलें आहे कीं माझें घर प्रार्थनेचें घर म्हणतील, परंतु तुम्ही त्याला लूटारुंची गुहा केली आहे" (मत्तय २१:१३) तुमचें हृदय देवाचें घर, मंदिर होण्यास सिद्ध केलें आहे. तेथें वस्ती करावी, त्यास सुंदर ठेवावे, प्रकाश, प्रेम व आनंद यांनीं तें भरून काढावे अशी त्याची इच्छा आहे. येशू आपल्या पापांची क्षमाच करावयास आला असें नाहीं, तर पापाच्या सत्ते-पासून व शक्तीपासून मोकळीक द्यावयास आला. "पुत्र जर तुम्हास स्वतंत्र करील तर तुम्ही खरोखरच स्वतंत्र व्हाल" (योदान ८:३६)

## चित्र ३ रा

हें चित्र खरोखर पश्चात्ताप केलेल्या पापी मनुष्याची हृदय-अवस्था दाखविते. तो आतां आपल्या पुष्कळ पापांची विशालता व भयानकता ओळखतो. ह्याचकरिता येशू वधस्तंभावर मरण पावला. देवाचें वचन जो देवदूत त्याला वधस्तंभ दाखवितो तेव्हां त्याचें अनुतप्त हृदय फुटून येतें व त्याच्या बहुत पापांबद्दल त्याला दु:ख आणि खेद होऊं लागतो. येशू ख्रिस्ताद्वारें देवाचें महान प्रेम तो पाहतो आणि त्याच्या हृदयाचें पाणी




चित्र नं. ३—पश्चात्तापी मन

होऊन जाते. कारण त्याला ह्या गोष्टीची जाणीव होऊं लागते कीं येशू ख्रिस्त देवाचा पुत्र हा त्याची पुष्कळ पापें काढून टाकावयास आला आणि त्या शापित झाडावर त्याच्याऐवजीं मरण सोसण्यास तयार झाला.

आपल्या पापासाठीं येशूला फटके मारिले, काटयांचा मुगुट घातला, हातांत व पायांत खिळे ठोकिले ही गोष्ट अनुतप्त झालेल्या पापी मनुष्याच्या पूर्ण लक्षांत आली, आणि त्याच्या हृदयांत व जीवनांत क्रांति घडून आली.

तो देवाच्या वचनांचा अभ्यास करितो आणि त्यांत स्वत:ला आरशांत पाहावे तसें पाहतो आणि अधिक आणि अधिक तो हें ओळखून घेतो कीं देवापासून तो फार दूरवर वाहवत गेला आहे, व देवाच्या आज्ञांच्या विरुद्ध पाप केलें आहे. आतां त्याला फार सात्विक दु:ख व पश्चात्ताप होऊं लागतो आणि अश्रुंनी व फार रडून देवापुढें आपलें अंत:करण ओततो, तेव्हां येशू त्याजवळ येतो. देवाचें प्रेम व शांति त्याच्या अंत:करणांत येतात आणि तो हें ओळखूं लागतो कीं "येशू ख्रिस्त देवाचा पुत्र याचें रक्त आम्हास सर्व पापापासून शुद्ध करिते" (१ योहान १:७) "परमेश्वर भग्नहृदयीं लोकांच्या सन्निध असतो; अनुतप्त मनाच्या लोकांस तो उद्धरितो" (स्तोत्र ३४:१८) देवाचें वचन पुन्हा असें विदित करिते, "जो दीन व भग्नहृदय आहे व माझीं वचनें ऐकून कपायमान होतो, त्याजकडे मी पाहतो" (यशया ६६:२) पवित्र आत्मा येशूची वचनें त्याच्या कानांत हळूंच सांगतो, "मुला धीर धर; तुझ्या पापांची क्षमा झाली आहे" त्याचें लक्ष वधस्तंभ व त्यावर सांडलेलें येशूचें रक्त यांकडे लागलें आहे व असा विश्वास धरितो कीं हें सर्व त्याच्या स्वत:करितां केलें गेले, त्याला असा अनुभव येतो कीं पापाचा भार काढून घेतला गेला. कारण येशूनें "आमचे व्याधी आपल्यावर घेतले, आमचे क्लेश त्यानें वाहिले, आमच्या अपराधांमुळें घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मामुळें ठेचला गेला. अशा आम्हां सर्वांचें पाप परमेश्वरानें त्याजवर लादिलें" (यशया ५३)

त्याचें हृदय जें पूर्वी काळें आणि घाणेरडें होतें त्यांत आतां पवित्र आत्म्याचा प्रकाश भरूं लागतो. येशूच्या रक्ताद्वारें तो बर्फासारखा स्वच्छ व शुभ्र होतो (यशया १:१८) पवित्र आत्मा त्याच्या आत्म्याला साक्ष देतो कीं त्याची क्षमा झाली आहे आणि दयेमुळें तो देवाचें लेंकरूं झाला आहे (रोम ८:१६) आतां त्याच्या मनाची खात्री झाली कीं "जो येशूवर विश्वास ठेवितो त्याचा नाश होणार नाहीं, तर त्याला सार्वकालिक जीवन मिळेल" (१ करिंथ ६ : १०-११) येशूच्या "कृपेच्या विपुलतेप्रमाणें त्या प्रियकरांत त्याच्या रक्ताच्या द्वारें आपल्याला मुक्ति म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा मिळाली आहे" (इफिस १:७) शरिराच्या पापी वासना आतां निघून गेल्या आणि त्याऐवजीं देव "ज्यानें प्रथम आम्हावर प्रेम केलें" त्यासाठीं जिवंत राहावें व त्याचीच सेवा करावी अशी उत्कट इच्छा


Copyright ANGP

निर्माण झाली. जग आणि जगांतील गोष्टी यांवर प्रेम करण्याऐवजीं तो आतां देव व देवाच्या गोष्टी यांवर प्रेम करितो.

ह्या चित्रांत आपण हें पाहतों कीं पापाचे प्रतिनिधि असलेले प्राणी हृदयाच्या बाहेर आहेत. सैतान आपलें भूतपूर्व सदन सोडण्यास नाखुष आहे, मागें वळून पाहतो, आणि पुन्हा प्रवेश मिळेल अशी आशा बाळगतो. ह्या कारणामुळें येशूनें आपणास आधींच सांगून ठेवलें जागृत राहा व प्रार्थना करा. सैतान तुम्हांपासून पळून जावा म्हणून त्याचा प्रतिकार करा.

त्याजबरोबर खिळिलेला (गलती २:२०) तुम्ही मृत झालां आणि तुमचें जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्यें गुप्त ठेविलेलें आहे (कलसै ३:३)

पापाला मेलेले आणि ख्रिस्त येशूमध्यें देवाला जिवंत झालेले (रोम ६:११)



चित्र नं. ६–ख्रिस्ताबरोबर खिळलेला

ह्या चित्रांत आपण एका ख्रिस्ती मनुष्याला पाहता. आपला प्रभु व तारणारा येशू ख्रिस्त ह्यानें केलेल्या यज्ञामुळें ह्याला पूर्ण शांति व मुक्तता

Copyright ANGP

मिळाली, आणि म्हणून "आपला प्रभु येशू ख्रिस्त याच्या वधस्तंभाच्या अभिमानाशिवाय कशाचाहि अभिमान बाळगणें माझ्या हातून न होवो; त्याच्या द्वारें जग मला व मी जगाला वधस्तंभावर खिळिलेला आहे" (गलती ६:१४) येशू वधस्तंभावर मरण पावला यासाठीं कीं आपणहि पापाचरणासंबंधानें मृत होऊन धार्मिक आचरणासाठीं जिवंत राहावें" (१ पेत्रस २:२४) ख्रिस्ती मनुष्य जगाला मेलेला आहे. आपणांस अशी आज्ञा दिली आहे कीं "आत्म्याच्या प्रेरणेनें चला म्हणजे देहवासना पूर्ण करणारच नाहीं" (गलती ५:१६)

प्रभु येशूचे कपडे त्याच्या अंगांतून काढून घेतल्यावर ज्या खांबाला त्याला बांधिले होते तो खांब हृदयाच्या ह्या चित्रांत दाखविला आहे, तसेंच ज्या चाबुकांनीं व कोरडयांनीं त्याला क्रूरपणानें मारिले तेंहि दाखविले आहेत. "आमच्या दुष्कर्मामुळें ठेचला गेला; आम्हास शांति देणारी अशी शिक्षा त्यास झाली" (यशया ५३:५) हेरोद व त्याच्या लोकांनी त्याची थट्टा केली, फटके मारिले, आणि त्याच्या डोक्यावर सोन्याचा मुगुट घालण्याऐवजीं काटयांचा मुगुट दाबला. हातीं राजदंड देण्याऐवजीं बोरू दिला, त्याच्यापुढें झुकले आणि उपहासानें म्हणाले, "हे यहुद्यांच्या राजा, तुझा जयजयकार असो," ते त्याजवर थुंकले आणि त्याजपासून बोरू काढून घेतला आणि डोक्यावर मारिले. ह्याप्रकारें निंद्य व दुष्ट रीतीनें त्याची थट्टा केल्यावर वधस्तंभीं देण्यासाठीं त्याला घेऊन गेले.

असें पुष्कळ ख्रिस्ती लोक आहेत कीं ते देवालयांत जाऊन प्रार्थना करितात, प्रभु-भोजन घेतात, देवाची गाणीं गातात, तरी आपल्या दुष्ट कृत्यांनीं आपल्या तारणाऱ्याला पुनरपि वधस्तंभावर चढवितात. "मला प्रभु प्रभु म्हणणाऱ्या प्रत्येकाचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यांत होईल असें नाहीं तर जो माझ्या स्वर्गिय पित्याच्या इच्छेप्रमाणें वर्ततो त्याचा होईल." (मत्तय ७:२१-२७)

ह्या चित्रांत आपण यहुदाची पैशाची पिशवीहि पाहतो. त्यानें प्रभु येशूचा विश्वासघात करून त्याला तीस रुपयास विकले, कारण पैशाच्या प्रेमानें त्याचें हृदय हस्तगत केलें व मन आंधळें केलें. हात-कंदील, सांखळ्या वगैरेचा उपयोग शिपायांनीं केला होता; त्यांनीं रात्रीं येशूला कैद करून

Copyright ANGP

नेलें होते; त्याच्या कपड्यावर चिठ्ठ्या टाकिल्या तेव्हां जुगार खेळ-ण्याच्या गोटींचा शिपायांनीं उपयोग केला होता तिहि चित्रांत दाखविली आहेत. याप्रकारें भविष्य केलेलें देववचन पूर्ण झालें, "ते माझीं वस्त्रें आपसांत वाटून घेतात, आणि माझ्या पेहरावावर चिठ्ठ्या टाकितात" (स्तोत्र २२:१८) येशूपासून त्यांनीं सर्व घेतले परंतु त्याला स्वत:ला झिडकारिले, आणि म्हणाले, "आम्हावर राज्य करण्यासाठी हा मनुष्य आम्हाला नको."


मानवांची ही इच्छा असते कीं देवापासून सर्व आशिर्वाद त्यांना मिळावे, पाऊस व सूर्य-प्रकाश ही भरपूर त्यांना मिळावे, परतु देवाचें पूर्ण अधिराज्य त्यावर चालावे ह्याकरितां ते तयार नसतात. नैराश्य किंवा विपतिच्या काळीं देवानें त्यांचें सहाय्य करावे एवढीच ते देवाची किंमत करितात.

शिपायांनीं त्याच्या कुशींत भाला भोंसकिला "तों रक्त व पाणी निघालें" (योहान १९:३४) कोंबडा आरवण्यापूर्वीं पेत्रसानें तीनदा येशूचा नाकार केला, पण नंतर रडून त्यानें पश्चात्ताप केला. आपल्या बोलण्यानें व कृतिनें येशूचा अंगिकार करीत आहां काय ? किंवा मनुष्यापुढें असें करण्यास तुम्हास लाज वाटते ? येशू म्हणाला, "जो कोणी मनुष्यासमोर मला स्वीकारील त्याला मीहि आपल्या स्वर्गांतील पित्यासमोर स्वीकारीन, पण जो कोणी मनुष्यांसमोर मला नाकारील त्याला मीहि आपल्या स्वर्गांतील पित्यासमोर नाकारीन" (मत्तय १०:३२-३३) येशू असेंहि, म्हणाला "आणि जो आपला वधस्तंभ उचलून घेऊन माझ्यामागें येत नाहीं तो मला योग्य नाहीं" (मत्तय १०:३८) येशू ख्रिस्त जो खडक त्यावर जो उभा राहतो तो धन्य ।

"प्रभू ख्रिस्ता कृपामय,
मला तूंचि हो आश्रय;
तुझी कूस खोंचली
पाणी रक्त वाहिलीं,
तेंपें उद्धरी मला
पापें सोडीं मंगळा"

प्रीति, आनंद, शांति,
विश्वास

ममता, चांगुलपणा,
सहनशीलता, सौम्यता,
इंद्रियदमन, गलती,
५:२२-२३




## चित्र नं. ५–देवाचें मंदिर

हें चित्र देवाच्या विपुल कृपेनें व दयेनें पापी मनुष्याचें हृदय शुद्ध व पवित्र केलें आहे असें दाखविते. प्रभु येशू ख्रिस्ताच्या वचनाप्रमाणें तें आतां खऱ्या अर्थानें देवाचें मंदिर, जो पिता, पुत्र, व पवित्र आत्मा आहे त्याचें वस्तिस्थान झालें आहें, "कोणाचें मजवर प्रेम असेल तर तो माझें वचन पाळील, आणि माझा पिता त्याजवर प्रेम करील, आम्ही त्याजकडे येऊन त्याजबरोबर वस्ती करूं" (योहान १४: २३) देव येशू ख्रिस्ताच्या द्वारें मनुष्याचा आदर करितो, आशिर्वाद देतो व उंच करितो (लूक१:५२)

हृदय आतां खरोखरीच देवाचें मंदिर झालें आहे. पापाला हद्दपार करण्यांत आलें. निरनिराळे प्राणी ज्यांच्यावर सैतान, जो लबाडांचा बाप, त्याचें धनीपण आहे, ते सर्व निघून गेले व त्यांच्याऐवजीं पवित्र आत्मा, जो सत्याचा आत्मा आतां वस्ती करितो. पूर्वीं पापाचें जे तिरस्करणीय केंद्र होतें तें हृदय एक सुंदर, फळ देणारें झाड किंवा बाग झालें आहे. त्यांत आत्म्याचीं फळें लागतात ती अशी, प्रीति, आनंद, शांति, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन, आणि अशांसारखी दुसरीं फळें जीं देवाला व मनुष्याला आनंददायक वाटतात. खरा द्राक्षवेल जो प्रभु येशू ख्रिस्त आहे त्याची फळ देणारी शाखा आतां तो झाला आहे. फळ देण्याचें गुज हें आहे कीं तो ख्रिस्तांत राहतो व ख्रिस्त व त्याची वचनें त्यांत राहतात (योहान १५ : १–१०) पवित्र आत्म्यानें तो भरला व बाप्तिस्मा झाला, त्यामुळें शरीर व शरिराच्या वासना ह्यांना जिंकून जुन्या मनुष्याला वधस्तंभीं देण्यास त्याला शक्ति आहे. पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यानें त्याला आत्म्यांत चालतां येते व शरिराला जिंकतां येते. तो जें पाहतो, ऐकतो, व स्पर्शानें समजतो त्याप्रमाणें नाहींतर विश्वासानें जगतो, कारण ख्रिस्त येशूवरील विश्वास हाच जगाला जिंकणारा जय आहे. खात्रीच्या व जिवंत आशेनें तो जगतो व आपला प्रभु येशू ख्रिस्त याच्या पुन्हा येण्याच्या गौरवी आशेनें शक्ति पावतो. देवाचें प्रेम जें सर्वकाळ टिकते त्या प्रेमांत व त्या प्रेमाद्वारें तो जगतो.

"जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य कारण ते देवाला पाहतील." (मत्तय ५:८) दाविद राजाजवळ जरी मुबलक धन होतें व शत्रूवर जय मिळवीत होता तरी त्याला ही जाणीव होती कीं त्याच्या हृदयांत मोठें युद्ध सुरू आहे, व ते शमविण्याची त्याची जी उत्सुकता होती तीमुळें तो म्हणतो, "हे देवा, माझ्या ठायीं शुद्ध हृदय उत्पन्न कर; माझ्या ठायीं स्थिर असा आत्मा पुन्हा घाल" (स्तोत्र ५१:१०) कोणीहि आपलें हृदय शुद्ध करूं शकत नाहीं किंवा नवें हृदय घालूं शकत नाहीं. फक्त दाविदासारखी देवाला विनंती करता येतें कीं माझ्या ठायीं नवें हृदय उत्पन्न कर. तुमच्या जीवनांत नवीन गोष्ट घडवून आणावी अशी देवाची इच्छा आहे. तुमच्या स्वत:च्या धार्मिकतेचा फाटलेला व चिंध्या लागलेला पोषाख, पोकळ वचनें व प्रतिज्ञा यांचे ठिगळ लाविल्यानें तुमचें हृदय देवाला राहण्यास योग्य

Copyright ANGP


असें स्थळ होत नाही. तो तुमचें सहाय्य करण्यास अगदीं उत्सुक आहे, कारण त्यानें वचन दिलें आहे, "मी तुम्हावर शुद्ध पाणी शिंपडीन म्हणजे तुम्ही शुद्ध व्हाल; तुमची सर्व मलिनता व तुमच्या सर्व मूर्ति यांपासून मी तुमची शुद्धि करीन. मी तुम्हास नवें हृदय देईन, तुमच्या ठायीं नवा आत्मा घालीन; तुमच्या देहांतून पाषाणमय हृदय काढून टाकीन व तुम्हांस मांसमय हृदय देईन. मी तुमच्या ठायीं माझा आत्मा घालीन, आणि तुम्ही माझ्या नियमांनीं चालाल, माझें निर्णय पाळून त्याप्रमाणें आचरण कराल, असें मी करीन" (यहेज्केल ३६: २५–२७) नव्या कराराचा हाच अर्थ आहे, हा देवानें आपला पुत्र येशू ख्रिस्त याच्या रक्तानें मुद्रित केला आहे.

ह्या चित्रांत आपण हें पाहतों कीं देवदूत परत आला आहे. सर्वकाळचें जीवन हें वतन ज्यांना मिळणार आहे त्यांची सेवा करण्यासाठी देवदूतांची नेमणूक केलेली असते आणि त्याचें भय बाळगणाऱ्यांच्या सभोंवार ते असतात (स्तोत्र ३४:७; ९१:११; दानियेल ६:२२; मत्तय २:१३; १३:१९; १८:१०; प्रेषित ५:१९; १२: ७–१०)

सैतानहि ह्या चित्रांत दिसतो. तो हृदयाच्या निकट उभा आहे, जणूं काय आपल्या जुन्या घरांत पुन्हा प्रवेश करण्याची संधीच शोधित आहे. ह्या कारणास्तव जागृत राहून प्रार्थना करावी अशी आपणांस ताकीद दिली आहे, कारण "तुमचा शत्रु सैतान हा गर्जणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावें हें शोधित फिरतो" (१ पेत्रस ५:८) पुष्कळदां प्रकाशाच्या दूताचें तो रूप धारण करितो, व ह्या जगाच्या वासनांनीं गैरसावध संतांना ठकवितों, आणि त्याच्या कावेबाजीनें निवडलेल्यांनाही ठकवितो. म्हणून सैतानाला जर आपण आडवे झालों तर तो आपणांपासून पळेल (याकोब ४:७)

## चित्र ६ वा

मागें म्हटलेल्या इसमाचें हें दुःखद चित्र आहे. एक डोळा बंद होत चालला आहे आणि हें दाखवीत आहे कीं ख्रिस्ती जीवनाच्या बाबतींत तो थंड व आळशी होत चालला आहे, आणि दुसरा डोळा बेशरमपणें चोहोंकडे पाहत आहे व जगाशीं प्रेम ठेवीत आहे. अंतर्यामीं असणारा प्रकाश मंद झाला आहे, आणि ख्रिस्ताबरोबर दुःख सहन करण्यासबंधीची जीं चिन्हें त्याच्या हृदयांत होतीं त्यांवर विरजण पडले व ते शक्तिहीन झाले. त्याच्या सभोंवार मोह उभे झाले आहेत व त्यांना विरोध करण्याऐवजीं तो त्यांना




चित्र नं. ६—मोहात पडलेलें व विभागलेलें हृदय

वश होत आहे. देवाच्या बोलण्याकडे लक्ष न देतां भुरळ घालणाऱ्याच्या कावेबाज सूचना व पोकळ वचनें यांकडे तो लक्ष देऊं लागला आहे. तो अजून उपासनेला हजर राहतो, धर्माच्या पांघुरणाखालीं आपले सांसारिक प्रेम लपवून ठेवितो. पण त्याच्या हृदयांत देवावरील प्रेम थंड झालें आहे, तो द्विमताचा, दोन मतांमध्यें अडखळणारा झाला आहे. तो जगाशीं चाळे करीत आहे तरी देवावर प्रेम कायमच असल्याचा आव आणीत आहे. त्याच्या हृदयांतील तारा त्याचा सत्‌सत्‌विवेक अंधुक झाला आहे, वध-

स्तंभ हंसतमुखानें आतां उचलण्यांत येत नाहीं, तर तो नाराजीनें वाहिलेलें ओझें होऊन बसला आहे, त्याचा विश्वास डळमळीत झाला आहे, देवाशीं प्रार्थनेंत बोलणें आतां बंद झालें आहे. त्याच्या हृदयाच्या स्थितीविषयीं तो निष्काळजी व उदासीन झाला आहे. व भुरळ घालणारा जो त्याच्या हृदयाच्या बाहेर दडी मारून बसला आहे त्यासाठीं हळूहळूं मार्ग मोकळा करीत आहे. खऱ्या विश्वासणाऱ्यांचा समागम त्याला आवडत नाहीं तर जगिक संगति त्याला प्रिय वाटते. मोराचा गर्वभाव आंत शिरूं पाहतो. त्याचा उद्धार दयेमुळें झाला होता ह्याचा त्याला विसर पडला आणि तो गर्विष्ठ होतो. पिण्याची इच्छा दारावर ठोकिते व आंत येण्याचा मार्ग शोधिते. विशेष प्रसंगाची वेळ असेल, आणि अशा प्रसंगीं जगिक मित्रांच्या देखत नाहीं म्हणणें लाजेचें, विचित्रपणाचें, भेकडपणाचें, व समाजाला न शोभणारें होईल; सैतान हळूंच त्याच्या मनाशीं बोलतो कीं एक वेळ प्याल्यानें तुझ्या आत्मिक जीवनाची कांहीं हानि होणार नाहीं. ऐहिक विचार व वासना जोर करूं लागतात. अनीतिच्या गंमतींत तो आनंद मानितो, बिभत्स चित्रावर आवडीनें पुन्हा पुन्हा नजर टाकितो, व कुसंगति त्याला चांगली वाटते. नाच-गृह, शंकार्ह करमणुकीचे प्रकार यांचा पुरस्कर्ता होतो, सैतानाच्या अनिष्ट सूचना आत्मसात करूं लागतो, तो त्याला सांगतो हें नैसर्गीक आहे, आणि एक पाप कांहीं पाप नव्हे.

आपल्या डोक्यावर दुष्ट व अमंगल विचारांचे पक्षी उडत राहिले तर आपण त्यांना थांबवूं शकत नाहीं, परंतु जर त्यांना आपल्या शिरावर उतरूं दिले, आपल्या हृदयांत घरटें बांधूं दिले, व पापी कर्म उबवूं दिले तर आपण दोषी आहों. सैतानाला आपली करंगळी धरूं दिली तर खात्रीनें तो आपला पूर्ण हात धरून आपला जीव आत्मा सर्वकाळ टिकणाऱ्या नरकांत ओढून नेईल, म्हणून देवाची गंभीर सूचना आहे कीं तरुणपणाच्या वासनांपासून दूर पळ व पापांची कोणतीहि आवृत्ति असो त्याच्याशीं खेळ खेळूं नको. येशू जो उद्धारकर्ता व विजेता त्याकडे पळून ये.

ह्या चित्रांत हृदयांत खंजीर खुपसत असलेला एक मनुष्य दाखविला आहे. ख्रिस्ती धर्माचा जे उपहास व विरोध करतात त्यांचे तो दर्शक आहे. त्यांच्या निंदा करणाऱ्या जिभेनें व थट्टा करणाऱ्या ओठांनीं ख्रिस्ती जनांच्या हृदयांत खंजीर खुपसतात व दुखापत करितात. द्विमनाचें हृदय अशा तडा-


ख्यांत टिकूं शकत नाहीं. देवापेक्षां मनुष्याची अधिक भीति बाळगूं लागतो, आणि मनुष्य काय म्हणेल किंवा काय करेल या भीतिमुळें तो मनुष्यांचा गुलाम बनतो व देवापासून दूर वाहवत जातो. क्रोध व राग हे निराशा व क्लेशांच्या प्रसंगीं स्वतःस प्रगट करितात व जबरीनें आंत घुसतात. जळणुकीचा दुष्ट सर्प जेव्हां इतर जन अधिक यशस्वी व संपन्न होतात तेव्हा प्रगट होतो व न जाणतांच रांगून आंत येतो व थोडीहि संधि त्याला मिळाली तर द्वेष व गर्व यांना द्वार उघडून देतो.

आपल्या प्रभु येशूनें दिलेल्या सूचनांकडे आपण लक्ष न दिलें तर पैशाचें प्रेम हृदयांत रांगून येण्यास उशीर लागत नाहीं. तो म्हणतो, "परिक्षेंत पडूं नये म्हणून जागृत राहा व प्रार्थना करा" (मत्तय २६ : ४१) "यास्तव आपण उभें आहों असें ज्यास वाटतें त्यानें पडूं नये म्हणून सांभाळावें" (१ करिंथ १० : १२) "सैतानाच्या कुयुक्तीपुढें टिकावयास तुम्ही समर्थ असावें म्हणून देवाची संपूर्ण सामग्री धारण करा" (इफिस ६ : ११)

## चित्र ७ वा

मनुष्याचें हृदय मागें घसरलें म्हणजे त्याची जी अवस्था होते त्याचें हें चित्र आहे. एकदां प्रकाश मिळाला, ज्यांनीं स्वर्गिय दानाची रुचि घेतली, जें पवित्र आत्म्याचें वाटेकरी झालें, ते आतां पतित झाले. सुवार्तेचें सत्य ज्याला "चांगली वार्ता" म्हणतात ती देऊन प्रगट केल्यावरहि जो मनुष्य पश्चात्ताप करीत नाहीं, किंवा देवाला शरण जात नाहीं अशा मनुष्याचेंहि हें चित्र आहे. देव विनवण्या करीत असतां जो मनुष्य आपलें मन कठोर करितो तो अधिक व अधिक बिघडत जातो. त्यानंतर स्वतःस सुधारण्याचें त्यानें कितीहि प्रयत्न केलें तरी ते व्यर्थ आहेत. मागें घसरणाऱ्या मनुष्याचें वर्णन स्वतः येशूनें असें केलें आहे. "मनुष्यांतून अशुद्ध आत्मा निघाला म्हणजे तो निर्जल स्थलीं विश्रांतिचा शोध करीत हिंडतो, आणि ती न मिळाली म्हणजे म्हणतो ज्या माझ्या घरांतून मी निघालों त्यांत परत जाईन, आणि तो आल्यावर तें झाडलेलें व सुशोभित केलेलें आहे असें पाहतो. नंतर तो जाऊन आपणापेक्षां दुष्ट असे सात आत्मे बरोबर घेऊन येतो; आणि ते आंत शिरून तेथें राहतात मग त्या मनुष्याची शेवटली दशा पहिल्या दशेपेक्षां वाईट होते" (लूक ११:२४.२६) "आपल्या ओकीकडे परतलेलें कुत्रें व गाळांत लोळण्यास अंग धुतल्यावर परतलेली

Copyright ANGP




चित्र नं. ७—मार्गं घसरलेलें कठोर हृदय

डुकरीण अशी जी खरी म्हण आहे तिच्याप्रमाणें त्यांची गोष्ट झाली आहे." (२ पेत्र २:२२)

पवित्र शास्त्राच्या ह्या वचनांत घसरलेल्या किंवा पश्चात्ताप न केलेल्या पापी मनुष्याचें यथायोग्य वर्णन केलें आहे. पूर्ण ठकबाजीच्या वृत्तीनें पापानें हृदयांत प्रवेश केला व आपला अंमल चालविला आहे. त्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या हृदयाची स्थिति दिसून येते. पवित्र आत्मा, तो सौम्य कबुत्तर ह्याला हृदय सोडून जाणें भाग पडले आहे, कारण पाप व पवित्र आत्मा दोघे एके ठिकाणीं राहूं शकत नाहींत. हृदय देवाचें

मंदिर व त्याच वेळेला सैतानाची गुहा होऊं शकत नाहीं. देवाचें वचन जो देवदूत त्याला दु:खानें निघून जावें लागते, तरी आशेनें मागें वळून पाहतो आणि आशा करितो कीं उधळ्या पुत्रासारखे तो किंवा ती पश्चात्ताप करील. "तेव्हां ज्या शेंगा डुकरे खात असत त्यांतल्या तरी खाऊन पोट भरावें." असें त्याला वाटलें; त्याला कोणी कांहीं दिलें नाहीं. नंतर तो शुद्धीवर येऊन म्हणाला माझ्या बापाच्या किती मोलकऱ्यांस भाकरीची रेलचेल आहे ! आणि मी येथें भुकेनें मरतो, मी उठून आपल्या बापाकडे जाईन व त्याला म्हणेन बाबा मीं स्वर्गाविरुद्ध व तुमच्या दृष्टीने पाप केलें आहे, आतां तुमचा पुत्र म्हणावयास मी योग्य नाहीं" (लूक १५:१६-१९) बापानें आपल्या पश्चात्तापीं पुत्राला पाहिले, त्याला क्षमा केली, व घरांत घेतले.

परंतु येथें दाखविलेल्या चित्रांत पश्चात्तापाचें चिन्ह नाहीं, देवाकडे वळण्याची इच्छा नाहीं, आणि येशूच्या पायाजवळ येऊन क्षमेची याचना नाहीं. उष्ण केलेल्या लोखडानें भाजावे असा त्याचा विवेक झाला आहे, आणि नि:शब्द करण्यांत आला आहे. त्याला कान असून येशूची वाणी ऐकूं येत नाहीं. त्याला डोळे आहेत पण त्याच्या पायाजवळ दाभाड उघडलेली नरकाची अथांग खाई आहे हें त्याला दिसत नाहीं. आपल्या पापांत कायम राहण्याची त्याला आतां कांहीं लाज वाटत नाहीं. त्याच्या हृदयावर सत्ता चालविण्यास सैतान आला आहे, आणि राजासारखा आसन मांडून बसला आहे. अजूनहि तो पांढऱ्या कबरेसारखा बाहेरून चांगला सन्मान्य व धार्मिक असल्याचा अभिमान कायम ठेवितो "परंतु आंत मेलेल्यांच्या हाडांनीं व सर्व प्रकारच्या मळानें भरलेले आहेत" (मत्तय २३:२७)

लबाडीचा बाप सत्याच्या आत्म्याची जागा पटकावून बसला आहे. प्रत्येक प्राणी, प्रत्येक पाप जें त्याच्या हृदयांत वसत आहे, त्याबरोबर एक एक भूत आणि अपवित्र आत्माहि आतां आंत आला आहे. त्याची जरी इच्छा असली कीं त्या राक्षसी गांजणाऱ्यापासून सुटका मिळावी तरी त्याला ते आवळून धरितात. "मोशाचें नियमशास्त्र कोणी तुच्छ मानिलें तर त्याजवर दया न होतां त्याला दोघांच्या किंवा तिघांच्या साक्षीवरून मरण-दंड होतो, तर ज्यानें देवाच्या पुत्राला पायांखालीं तुडविलें, जेणेंकरुन तो स्वत: पवित्र झाला होता, तें कराराचें रक्त अपवित्र मानिलें आणि कृपेच्या आत्म्याचा अपमान केला तो किती अधिक कठिण दंडास पात्र ठरेल म्हणून तुम्हांस वाटते" (इब्री १०:२८-२९)

Copyright ANGP


प्रिय मित्रा, हें चित्र तुझ्या हृदयाच्या स्थितिशीं साम्य ठेवणारे असेल तर विलंब न लावतां हृदयाच्या गहराइतून देवाला हांक मार "शेवटल्या घटकेपासून तो तारावयास समर्थ आहे." खऱ्या पश्चात्तापी भावानें तूं येशील तर तो सर्व पापांची क्षमा करावयास समर्थ व तयार आहे. तूं जर तयार असशील तर तो सैतान व अंधःकाराचें त्याचें सैन्य यांना तुझ्या हृदयांतून बाहेर काढण्यास समर्थ आहे. कुष्ठ रोगी ज्याप्रमाणें त्याकडे येऊन म्हणाला तसें तूं म्हण, "तुझी इच्छा असली तर मला शुद्ध करावयास तूं समर्थ आहेस." येशू म्हणाला, "माझी इच्छा आहे, शुद्ध हो" (मार्क १:४०-४१) परंतु जर तूं आपलें हृदय कठिण ठेवूं लागलास आणि प्रकाशापेक्षां अंधाराची आवड धरिलीस तर मग कांहीं आशा नाहीं, कांहीं सहाय्य नाहीं, कारण जीवनाच्या ऐवजीं मरणाची तूं निवड केली आहेस "पापाची मजूरी मरण आहे" (रोम ६:२३)

## चित्र ८ वा

येथें आपण दिरंगाई करणारा व मागें घसरणारा पापी मनुष्य मृत्युनजीक येत असतांना पाहतो, त्याचें शरीर दुःखानें भरलेलें व जीव मृत्यूच्या भीतिनें व्यापला आहे. मृत्यु अपेक्षा नसलेल्या व इच्छा नसलेल्या काळीं जवळ येऊन ठेपला. पापाची खोटी सुखें नाहींशी झाली, आणि पापाच्या मजूरीचें भीतिदायक भयंकर सत्यस्वरूप आतां जवळ आलें. आपल्या बळावर नरकाच्या यातना आपली पक्कड मजबूत करीत आहेत. आतां तो प्रार्थना करूं इच्छितो, पण देवाशीं समागम जुळत नाहीं, देवाचें प्रेम त्यानें मागेंच लाथाळलें होतें. त्याचें जुनें मित्र त्याच्या पलंगाजवळ उभें राहण्यास भितात, त्यांचे पोकळ बोल आतां त्याचे समाधान करूं शकत नाहींत, अनीतिनें मिळवलेला त्याचा पैसा त्याचें आयुष्य वाढवूं शकत नाहीं, किंवा त्याचा जीव वाचवूं शकत नाहीं अगर त्याच्या यातना कमी करूं शकत नाहीं. देवाविषयीं एकाग्रतेनें तो विचार करूं शकत नाहीं, कारण असें करण्यास सैतान त्याला संधिच देत नाहीं.

ज्या सर्व गोष्टींवर त्याचें प्रेम होतें व ज्यासाठीं तो जिवंत राहत होता त्यांच गोष्टी त्याची चेष्टा करूं लागल्या; त्याचा अविश्वासू व कदाचित तारण न झालेला पालक त्याचें मुळींच साह्य करूं शकत नाहीं, कारण त्यानें देवाची दया लाथाळली होती आणि नियमांच्या शिक्षेखालीं सांपडला होता. त्याला आतां समजूं लागलें कीं "जिवंत देवाच्या हातीं

Copyright ANGP




चित्र नं. ८—पाप्याचा शेवट


सांपडणें हें भयंकर आहे." (इब्री १०:३१) एका सोइस्कर दिवशीं किंवा मरणकाळीं देवाबरोबर आपला हिशोब व्यवस्थित करून घेऊं अशी आशा त्यानें केली होती, परंतु त्याला आतां कळून आलें कीं फार उशीर झाला आहे. हजारों लोक आपल्या मरणकाळीं देवाला शोधण्याची संधि न

मिळतांच अकस्मात मरतात; म्हणून हें अत्यंत आवश्यक आहे कीं तो सांपडण्यासारखा आहे तोंच त्याला शोधावे. समाधान करणारे व तारण करणारे देवाचें वचन ऐकण्याऐवजीं हा मरंत असलेला पापी मनुष्य ज्यानें आपल्या आयुष्यांत देवाची दया व प्रेम झिडकारिले होते तो आतां न्यायाधिश व पार करणारा याचा हुकूम ऐकतो "अहो शापग्रस्तहो, सैतान व त्याचे दूत यांसाठीं जो सार्वकालिक अग्नि सिद्ध केला आहे त्यांत माझ्यापुढून जा" (मत्तय २५:४१) "मनुष्यांस एकदांच मरणें व त्यानंतर न्याय होणें नेमून ठेविलें आहे" (इब्री ९:२७)

## चित्र ९ वा

हें चित्र एका ख्रिस्ती मनुष्याचें आहे. जो अग्निसारखा परिक्षा व मोह यांना तोंड देऊन त्यावर विजयी होतो. सर्व बाजूंनी त्याजवर परिक्षा आल्या तरी तो स्थिर राहून शेवटपर्यंत तोंड देतो. कारण येशू ख्रिस्ताद्वारें तो विजेत्याहून अधिक आहे. ख्रिस्ती धावेंत त्यानें भाग घेतला एवढेंच नाहीं तर चिकाटीनें प्रयत्नशील आहे, धिरानें धांवतो, डावीकडे पाहत नाहीं किंवा उजवीकडे पाहत नाहीं तर "आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू याजकडे पाहतो" (इब्री १२:२) सैतान व त्याचें सैन्य विश्वास ठेवणाऱ्या हृदयाच्या भोंवती जमा होतात आणि देवाच्या लेंकराला बहकविण्याचा व्यर्थ प्रयत्न करितात. गर्व, धनलोभ, अनीतिचें भूत आणि इतर सर्वच तेथें आहेत. ख्रिस्ताच्या ऐवजीं आपण गाढव पाहतों, बहुधा पाप निराळ्या स्वरूपांत आपल्याजवळ येतें, आणि वेगळ्या वेषानें व नांवानें छपून राहते, परंतु जागृत ख्रिस्ती पाप धर्माच्या वेषांत येवो अगर प्रकाशाचा दूत बनून येवो तत्काळ ओळखतो, कारण देवाचें वचन आणि सत्याचा आत्मा त्याला सत्यांत चालवितात. एक मनुष्य मद्याचा पेला एका हातांत धरून ख्रिस्ती मनुष्याच्या भोंवती नाचतो आणि जगाच्या सुखांनीं त्याला मोहांत पाडायचा प्रयत्न करितो. तथापि पवित्र झालेल्या ख्रिस्ती मनुष्यावर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं, कारण पापाला व जगाला ख्रिस्ताबरोबर तो वधस्तंभीं दिलेला आहे. चित्रांतील दुसरा मनुष्य, ख्रिस्ती मनुष्याला कटचार मारीत आहे. अपवित्र भाषण, निंदा, थट्टा, देवाच्या वैऱ्याकरवीं धमकी आणि पुष्कळदां मानलेल्या विश्वासणाऱ्यां करवीं–ह्या प्रकारांनीं खऱ्या विश्वासणाऱ्यांच्या हृदयांत कटचार मारिली

Copyright ANCP




चित्र न. ९–विजय पावणारें हृदय

जाते. परंतु लोक काय म्हणतात ह्यासंबंधी तो मेलेला आहे, आणि परमेश्वर काय म्हणतो ह्याच्याचकडे तो लक्ष देतो. येशूच्या वचनांची तो आठवण करितो, "जेव्हां माझ्यामुळें लोक तुमची निंदा व छळ करितील आणि तुम्हाविरुद्ध सर्व प्रकारचें वाईट लबाडीनें बोलतील तेव्हां तुम्ही धन्य, आनंद व उल्हास करा, कारण स्वर्गांत तुमचें प्रतिफळ मोठें" (मत्तय ५: ११–१२)

पाप, शरीर, (हे स्वेच्छा आहे) आणि सैतान ख्रिस्ती मनुष्याला देवाच्या प्रेमापासून वेगळे करण्यासाठीं सतत प्रयत्न करितात. परंतु मोठचा

आनंदानें व विश्वासानें तो खऱ्या अर्थानें असें म्हणतो, "ख्रिस्ताच्या प्रीती-पासून आपल्याला कोण विभक्त करील ? क्लेश, आपत्ति, छळणूक, उपासमार, नग्नता, संकट किंवा तरवार हीं वेगळे करितील काय ?" (रोम ८:३५) "नाहीं. नाहीं ज्यानें आपणावर प्रीति केली त्याच्यायोगें या सर्व गोष्टींत आपण विशेष विजयी आहों" (रोम ८:३७) देवाची सर्व सामग्री धारण करून सैतानाच्या कुयुक्तीपुढें टिकावयास आणि येशू ख्रिस्ताद्वारें सर्व परिक्षांवर जय मिळविण्यास तो समर्थ आहे. ख्रिस्तानें सर्व परिक्षा व मोह यांवर जय मिळविला. यासाठीं कीं त्याच्या द्वारें आपणहि जय मिळवून गौरवाचा मुगुट प्राप्त करावा.

त्याच्या विवेकाचा तारा स्पष्ट आणि तेजस्वी आहे. त्याचें हृदय विश्वासानें भरलें आहे आणि पवित्र आत्मा त्यावर आहे. जे जय पावतात व शेवटपर्यंत टिकून राहतात अशांना जीं मौल्यवान वचनें देण्यांत आलीं आहेत त्यांची आठवण देवाचें वचन जो देवदूत तो करून देतो. "जो विजय मिळवितो त्याला देवाच्या बागेंत जे जीवनाचें झाड आहे त्यावरचें फळ मी खावयास देईन" "जो विजय मिळवितो त्याला दुसऱ्या मरणाची बाधा होणार नाहीं" "जो विजय मिळवितो त्याला गुप्त ठेविलेल्या मान्न्यांतून मी देईन, आणि त्याला पांढरा खडा देईन, त्या खड्यावर नवें नांव लिहिलें आहे." "जो विजय मिळवितो व शेवटपर्यंत माझीं कृत्यें करीत राहतो... त्याला अधिकार...देईन" "जो विजय मिळवितो तो अशा रीतीनें शुभ्र वस्त्रें परिधान केलेला होईल, मी जीवनीं पुस्तकांतलें त्याचें नांव खोडणारच नाहीं, आणि माझ्या पित्यासमोर व त्याच्या दूतांसमोर मी त्याचें नांव अंगिकारीन." "जो विजय मिळवितो त्याला मी आपल्या देवाच्या मंदिरां-तील स्तंभ करीन, तो तेथून कधीं बाहेर जाणारच नाहीं" "जो विजय मिळवितो त्याला मी आपल्या राजासनावर आपल्याजवळ बसू देईन. मीहि तसा विजय मिळवून आपल्या पित्याजवळ त्याच्या राजासनावर बसलों" (प्रगटी २:७,११,१७,२६, ३:५,१२,२१)

पैशाची उघडी पिशवी हें दाखवितें कीं फक्त त्याचें हृदयच नव्हें तर त्याचा पैसाहि देवाकरितां पवित्र केला आहे. त्याचें जगीक धन उधळ-ण्याच्या ऐवजीं, गरिबांना तो सहाय्य करितो, आपला दशमांश (उत्पन्नाचा दहावा भाग) आणि दानें आणि त्याजवळ जें आहे तें सर्व देवाला देतो, देवाच्या गौरवासाठीं सर्व कांहीं करितो.

भाकरीचा तुकडा व मांस हें दर्शवितात कीं तो स्वच्छ व नेमस्त जीवन जगतो. मादक द्रव्य पिऊन, किंवा रक्त अगर गुदमरलेलें खाऊन, किंवा दुसरें कोणतेहि अमंगल अन्न खाऊन तो स्वतःस विटाळवीत नाहीं. तो आपला पैसा उधळीत नाहीं व आपलें शरीर (जें देवाचें मंदिर आहे) तंबाकुचा कोणताहि प्रकार ओढून अगर चघळून किंवा नुकसानकारक औषधी किंवा विषारी पदार्थ यांचे सेवन करून कलंकित करीत नाहीं, पण हितकारक, स्वच्छ व पौष्टिक अन्न खातो. त्याचें हृदय प्रार्थनेचें घर झालें आहे. देवालयांतील उपासनेला तो नियमानें आणि आदरानें सर्व प्रकारच्या हवामानांत व सर्व परिस्थितींत हजर असतो. त्याला प्रार्थना आवडते, मग ती प्रार्थनेच्या घरांत असो किंवा कुटुंबांतल्या लोकांत असो, किंवा त्याच्या आंतल्या खोलींत असो, कारण तो हें जाणून आहे कीं प्रार्थनेंत देवाशीं सह-भागिता ठेवल्याशिवाय ख्रिस्ती मनुष्य अस्तित्वांत राहूं शकत नाहीं.

उघडलेलें पुस्तक हें दर्शविते कीं पवित्र शास्त्र त्याच्याकरितां एक उघडें पुस्तक आहे, तो तें रोज वाचितो व मनन करितो, त्यांतून त्याला सूज्ञता व शक्ति मिळते, जीवन व उजेड, होय अकथित संपत्ति मिळते. तें त्याच्या पावलाकरितां उजेड झालें आहे, आणि शत्रूला जिंकणारी तरवार झाली आहे. त्याच्या जीवाकरितां रोजची आत्मिक भाकर, तहान भागविणारें पाणी, स्वतःस स्वच्छ करण्यासाठीं आंघोळीचें पाणी, आणि स्वतःस पाहण्यासाठीं आरसा झाला आहे.

वधस्तंभ उचलून नेण्यांत त्याला आनंद वाटतो कारण तो हें ओळखून आहे कीं वधस्तंभाशिवाय कोणताहि मुगुट मिळत नाहीं. ज्याअर्थीं तो हें ओळखून आहे कीं नवीन जीवनासाठीं ख्रिस्ताबरोबर तो पुन्हा उठला आहे, त्याअर्थीं तो वरल्या गोष्टी, सर्वकाळच्या गोष्टी, न पाहिलेल्या गोष्टी शोधितो. देवाला भेटण्यास तो तयार आहे आणि पाण्याजवळ लाविलेल्या झाडासारखा तो आहे, जें हंगामी फळ देतें, खऱ्या द्राक्षवेलीच्या शाखेसारखे बहुत फळ देते. मरणाची भीति तो जाणत नाहीं, कारण देवाचें पूर्ण प्रेम, जें पवित्र आत्म्याद्वारा त्याला मिळालें, त्याच्या हृदयांत भरलेलें आहे.

## चित्र १० वा

येशू म्हणाला, "पुनरुत्थान व जीवन मी आहे; जो मजवर विश्वास ठेवितो तो मेला असला तरी जगेल; आणि जो जिवंत असून मजवर




**10.** चित्र नं. १०–गौरवानें गृहीं परतणें

विश्वास ठेवितो तो कधींहि मरणार नाहीं" (योहान ११:२५-२६) "'जो माझें वचन ऐकतो आणि ज्यानें मला पाठविलें त्याजवर विश्वास ठेवितो. त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झालें आहे आणि त्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाहीं; तो मरणांतून जीवनांत पार गेला आहे" (योहान-

५:२४) ख्रिस्ती मनुष्याला मृत्युमुळें यातना अगर भीति वाटत नाहीं. "मरण विजयांत ग्रासिलें गेलें आहे. अरे मरणा, तुझा विजय कोठें ? अरे मरणा, तुझी नांगी कोठें ? जो देव आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताद्वारें आपणाला जय देतो त्याची स्तुति असो" (करिंथ १५।५४-५७)

जो मनुष्य देवाबरोबर राहतो व चालतो तो मरणाला भीत नाहीं. गमनकाल येतो तेव्हां तो आनंदानें जातो. प्रेषित पौल म्हणतो, 'ऐथून सुटून जाऊन ख्रिस्ताजवळ असण्याची मला उत्कंठा आहे; कारण हें त्यापेक्षां फारच चांगलें आहे" (फिलिपै १:२३) वधस्तंभावर येशू त्याजकरितां मरण पावला व त्याला बंधमुक्त केलें, त्याचें मुख पाहण्यास ख्रिस्ती उत्सुक असतो. पवित्र आत्मा येशूच्या शब्दांची आठवण करून देतो "तुमचें अंतःकरण अस्वस्थ होऊं नये; देवावर विश्वास ठेवा, आणि मजवरहि विश्वास ठेवा. माझ्या पित्याच्या घरांत राहण्याच्या जागा पुष्कळ आहेत....पुन्हा येऊन तुम्हास आपल्याजवळ घेईन, यासाठीं कीं जेथें मी आहे तेथें तुम्हीहि असावे" (योहान १४:१-३) "डोळयानें पाहिलें नाहीं कानानें ऐकलें नाहीं व माणसाच्या मनांत आलें नाहीं, तें आपणावर प्रीति करणाऱ्यांसाठीं देवानें सिद्ध केलें आहे" (१ करिंथ २:९) ह्या पृथ्वीवर प्रभु येशू ख्रिस्ताच्या पावलांवर पाऊल टाकून जो चालतो त्यासाठीं स्वर्गांत ज्या जागा तयार केल्या आहेत त्याच्या गौरवाचें वर्णन करण्यासाठीं किंवा समजावून सांगण्यासाठीं पृथ्वीवरील भाषांत शब्दच नाहींत.

भयजनक सांपळयाच्या (मृत्यु) ऐवजीं ह्या शेवटच्या चित्रांत एक देवदूत किंवा देवाचा निरोप्या आपणांस दिसत आहे. दोषनिराकरण झालेल्या आत्म्यास देवाकडे परत नेण्यासाठीं तो वाट पाहत आहे. मर्त्य शरीराच्या शृखलेपासून सुटून जीव व आत्मा स्वर्गाच्या द्वारांतून भरारी मारून त्यांच्या उराकडे येतात. त्याजवर त्यानें प्रेम केलें, त्याजकरितां तो जिवंत राहिला व त्याजकरितां पृथ्वीवर तो मरण पावला. देवाच्या समक्षतेंत सुखावह स्वागत त्याची वाट पाहत आहे; तेथें त्याचा प्रभु व धनी त्याचें स्वागत अशा स्तुत्य शब्दांत करितो, "शाबास भल्या व विश्वासू दासा, आपल्या धन्याचें सुख भोगावयास ये" (मत्तय २५:२१) सैतानाची शक्ती यापुढें त्याजवर चालत नाहीं कारण "परमेश्वराच्या दृष्टीनें त्याच्या भक्ताचें मरण अमोल आहे" (स्तोत्र ११६:१) "तेव्हां स्वर्गांतून झालेली

वाणी मी ऐकिली, ती म्हणाली लिही:–प्रभूमध्यें मरणारे आतांपासून धन्य आहेत. आत्मा म्हणतो: खरेंच आपल्या कष्टांपासून सुटून त्यांस विसांवा मिळेल; त्यांचीं कृत्यें त्यांजबरोबर जातात" (प्रगटी १४:१३)

## शेवटची ताकीद

प्रिय वाचका; तुझें हृदय त्याला देतां यावे म्हणून देव तुझें सहाय्य करो; तो तुजवर प्रेम करितो, तो सविनय तुला आतांच म्हणतो "माझ्या मुला (मुली), तूं आपलें चित्त मला दे" (नीति २३:२६) येशूला तुझें श्रमलेलें, आशाभंग झालेलें, दुखत असलेलें हृदय दे, आणि तो तुला नवें हृदय व नवा आत्मा देईल. तुझ्या ठग हृदयाच्या इच्छांवर चालून स्वत:स फसवून घेऊं नको कारण "जो आपल्या मनावर भरंवसा ठेवितो तो मूर्ख, पण जो सुज्ञतेनें चालतो त्याचा बचाव होतो" (नीति २८:२६) आपलीं पापें सोड आणि धार्मिकतेस चिकटून राहा कारण "पापाचें वेतन मरण आहे, पण देवाचें कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्यें सर्वकाळचें जीवन आहे" (रोम ६:२३)

आणि तूं आपलें जीवित देवाच्या हातीं दिलें आह तर ख्रिस्त येशूंत जी प्रीति व विश्वास आहे त्याद्वारें सुवचनांना दृढ धर. याच कारणास्तव पौलस म्हणतो. "कारण मी कोणावर विश्वास ठेविला आहे हें मला ठाऊक आहे, आणि तो माझी ठेव त्या दिवसांसाठीं राखावयास शक्तिमान आहे असा मला भरवसा आहे" (२ तीमथ्य १:१२) अति पवित्र विश्वासांत स्वत:ची वाढ करा, पवित्र आत्म्यांत प्रार्थना करा, येशू आपला प्रभु जो मार्ग सत्य व जीवन आहे त्यावर लक्ष ठेऊन देवाच्या प्रेमांत स्वत:ला कायम ठेवा, "राजांचा राजा व प्रभूचा प्रभू" जे त्याचे आहेत त्यांस घेऊन जाण्यासाठीं लौकर परत येईल.

"तुम्हांस पतनापासून राखण्यास आणि आपल्या गौरवाच्या समक्षतेंत निर्दोष असे उल्हासयुक्त उभें करण्यास जो समर्थ आहे, अशा आपल्या उद्धारक एकाच देवाला येशू ख्रिस्त आपला प्रभु याच्या द्वारें गौरव, महत्त्व, पराक्रम व अधिकार हीं युगारंभापूर्वी आतां व युगानुयुग आहेत आमेन" (यहुदा २४-२५)

—: समाप्त :—

Copyright ANGP

**A SPECIAL WORD FROM ANGP**
**UN MONDE SPÉCIAL DE L'ANGP**
**UMA PALAVRA ESPECIAL DA ANGP**

**This booklet "The Heart of Man" is available in over 538 languages and dialects spoken throughout the world (Africa, Asia, The Far East, South America, Europe, etc.) Our Heart Book is now also available on cell phones, tablets, etc from www.angp-hb.co.za or as an APP "Heart of Man" on Android phones.**

**Le livre du "Coeur de l'homme" peut etre obtenu en plus de 538 langues et dialectes parles dans le monde entier, a savoir: Afrique, Amerique, Asie, Extreme Orient, Europe. Notre Livre du Coeur est maintenant aussi disponible sur votre Telephone cellular, plaques, etc. de www.angp-hb.co.za ou comme une Application "Heart of Man" sur telephones Android.**

**Este livro "O Coracao do Homem" e obtfdo em mais de 538 linguas e dialectos falados em todo o mundo, a saber: (Africa, Asia, America do Sul, Extremo Oriente, Europa, etc). O nosso Livro O Coração do Homem tambem esta agora disponivel em telefone celular, tablets, etc. de www.angp-hb.co.za ou como um aplicativo "Heart of Man" nos telephones celulares Android.**

Copyright ANGP

**The 10 heart pictures contained in this booklet are also available in the form of large coloured picture charts (86 x 61cm) bound together in a set of 10 pictures. These "Heart Charts" can be obtained with European or African features and are particularly suitable to be used in conjunction with the Heart Book for class-teaching, open air evangelization etc. Kindly contact us to ascertain the latest subsidized price of this chart.**

**Les 10 images du coeur qui figurent dans ce livre peuvent etre obtenues en tableaux de couleur, format 86 x 61 cm, avec des physionomies europeennes ou africaines. Ils peuvent etre utilises en meme temps que le livre du coeur pour des classes bibliques, a**

l'ecole du dimanche ou lors de reunions de plein air. Soyez aimable de nous contacter pour assurer les derniers prix en cours du tableau.

As 10 imagens do coracao, contidas neste livro podem ser obtidas num conjunto de 10 imagens em colorido no tamanho de (86 x 61 cm). Estes "Cartazes do Coracao podem ser obtfdos com caracterfsticas Europeias e Africanas e podem ser usados em conjuncao com o mesmo livro em classes de ensino biblico, evangelizacao ou ao ar livre. Agradeciamos que nos contacta- se para confirmacao do ultimo preco dos cartazes.



Copyright ANGP

Kindly write to us if you are able to assist us with further translations of our free Gospel literature, informing us of the language into which you could translate this Gospel literature. Your assistance would be appreciated.

If you have found salvation in Christ, or have been otherwise blessed through our Gospel literature, please let us know. We would like to thank God with you, and remember you further in our prayers.

Nous vous invitons a nous contacter pour faire des arrangements concernant de nouvelles traductions de notre litterature, nous informant de la langue dans laquelle vous pouvez traduire cette litterature evangelique. Votre aide sera beaucoup appreciee.

Si vous avez trouve le salut en Christ ou si vous avez ete beni par notre litterature, nous vous prions de nous le faire savoir. Nous aimerions remercier Dieu avec vous et prier pour vous.

Nos vos convidamos a nos contactar, afim de fazer qualquer arranjo concernente a novas traducoes de nossa literatura em outras Ifnguas. Vossa assistencia sera muito apreciavel.

Se tem encontrado a salvacao em Cristo, ou se tem sido abencoado por intermedio da nossa literatura evangelica, faca o favor de nos

informar. Pois nos gostarfamos de agradecer a Deus juntamente convosco, e lembra-lo sempre em nossas oracoes.

For free Gospel literature, books and tracts in over 538 languages, write to:

Pour obtenir gratuitement de la litterature evangelique, des livres et des traites en plus de 538 langues, ecrivez a:

Para obter gratuftamente a literatura evangelica, livros e folhetos em mais de 538 lfnguas diferentes escreva para:

E-MAIL: info@angp-hb.co.za
info@angp.co.za

**ALL NATIONS GOSPEL PUBLISHERS**
**P.O. Box 2191**
**PRETORIA**
**0001**
**R.S.A.**

Copyright ANGP

A Gospel Literature Mission financed by donations
Une Mission de litterature evangelique financee de dons
Missao de literatura Evanqelica financiada por donativos

(Reg. No. 1961/001798/08)